सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ९७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ७ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# भारतीय सैन्याचे 'ऑपरेशन सिंदूर'; पाकिस्तानच्या हद्दीत १०० किमी आत घुसून मारले

## भारताने केलेल्या मध्यरात्री हल्ल्यानंतर पाकिस्तानी पंतप्रधान शहबाज शरीफ यांची झोप उडाली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली**

भारताने दहशतवादाविरोधात मोठी कारवाई करत मंगळवारी रात्री दीडच्या सुमारास ९ दहशतवादी ठिकाणे उद्धवस्त केली. या हल्ल्याला ऑपरेशन सिंदुर असं नाव देण्यात आले. तिन्ही सैन्य दलाने मिळून ही संयुक्त कारवाई केली. भारताच्या धाडसी सैन्याने पाकिस्तानच्या ४ आणि पीओकेमध्ये ५ ठिकाणी एकाचवेळी टार्गेट केले. भारतीय गुप्तचर यंत्रणा ठ-थ ने हे सर्व टार्गेट निश्चित केले होते. ज्यानंतर पूर्ण कारवाईने लश्कर आणि जैशच्या ठिकाणांवर हल्ला करण्यात आला.

बहावलपूर - आंतरराष्ट्रीय सीमेपासून जवळपास १०० किमी अंतरावरील हे ठिकाण असून तिथे जैश ए मोहम्मदचं मुख्यालय होते, जे भारतीय सैन्याने उद्धवस्त केले.

मुरीदके - हे दहशतवादी ठिकाण बॉर्डरपासून ३० किमी अंतरावर होते, तिथे लश्कर ए तोयबाचे सेंटर होते, जे २६/११ मुंबई हल्ल्याशी जोडले होते.

गुलपूर - हे दहशतवादी ठिकाणी डजउ पासून ३५ किमी अंतरावर होते.

लश्कर कॅम्प सवाई - पीओकेच्या तंगाधार सेक्टरच्या ३० किमीवर अंतरावर हे ठिकाण होते.

बिलाल कॅम्प - जैश ए मोहम्मदचं लॉन्चपॅड, हे ठिकाण दहशतवाद्यांना सीमेपलीकडे पाठवण्यासाठी वापरले जायचे

कोटली- एलओसीपासून १५ किमी अंतरावरील लश्कर ए तोयबाचा कॅम्प, याठिकाणी ५० हून अधिक दहशतवादी ट्रेनिंग घेत होते

बरनाला कॅम्प - एलओसी पासून १० किमी अंतरावर हे ठिकाण आहे

सरजाल कॅम्प - सांबा कठुआच्या समोर इंटरनॅशनल बॉर्डरपासून ८ किमी अंतरावर जैशचं प्रशिक्षण केंद्र होते

मेहमूना कॅम्प - हे हिज्बुल मुझाहिद्दीनचे प्रशिक्षण सेंटर होते, जे बॉर्डरपासून १५ किमी अंतरावर होते.




### भारताच्या स्ट्राईकवर पाकिस्तानी पंतप्रधानाचे उत्तर

भारताने केलेल्या मध्यरात्री हल्लूयानंतर पाकिस्तानी पंतप्रधान शहबाज शरीफ यांची झोप उडाली. शरीफ यांनी सोशल मीडियावर निवेदन जारी करत पाकच्या जमिनीवर शत्रूने हल्ला केल्याचे म्हटले. पाकिस्तान युद्ध लादण्याच्या या कृत्याला उत्तर देण्याचा अधिकार आहे. हे उत्तर दिले जाईल. पाकिस्तानी सैन्य आणि जनता एकजूट आहे असं त्यांनी सांगितले.

### पंतप्रधान मोदी स्वत: मॉनिटर करत होते 'ऑपरेशन सिंदूर'

पहलगाम दहशतवादी हल्लूयाचा बदला म्हणून, भारताच्या लष्कर, नौदल आणि हवाई दलाने संयुक्तपणे पाकिस्तानमधील दहशतवादी छावण्यांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. भारताने आपल्या हद्दीत राहून हा हवाई हल्ला केल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. तथापि, हा हवाई हल्ला पाकिस्तानच्या सुमारे १०० किमी आत करण्यात आला. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः ापरेशन मॉनिटर करत होते. ९ टार्गेट ठेवण्यात आले होते. ९ च्या ९ टार्गेट यशस्वी झाले आहेत.


### ऑपरेशन सिंदूर नाव का दिलं?

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्लूयानंतर भरतीयांसह जगभरात संतापाची लाट पसरली होती. या दहशवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्लूयात २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकांचा मृत्यू झाला होता. मात्र या भ्याड हल्लूयातील सर्वात भयावह गोष्ट म्हणजे दहशतवाद्यांनी सामान्य पर्यटकांना लक्ष केलं. सोबतच पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून गोळी झाडली आहे. या कृत्यानं नक्कीच एक गोष्ट अधोरेखित केली जात आहे ती म्हणजे हा हल्ला केवळ देशावर नाही तर त्यामागे धार्मिक आणि देशाच्या एकात्मतेवर ही हल्ला असल्याचे बोलले जात आहे. या भ्याड हल्लूयावेळी महिलांचं कुंकू म्हणजे त्यांच्या पतींना लक्ष करण्यात आलं.

# २५ मिनिटांत ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त कर्नल सोफिया कुरैशी यांनी सांगितला थरार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली**

पहलगाम दहशतवादी हल्लूयाला प्रत्युत्तर देत भारताने पाकिस्तानीदहशतवादी तळांवर हल्ले केले. रात्री १ वाजून ०५ मिनिटांपासून ते १ वाजून ३० मिनिटांपर्यंत ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत ९ दहशतवादी ठिकाणांना टार्गेट करण्यात आले. पहलगाम हल्लूयात झालेल्या निष्पाप नागरिकांच्या मृत्यूला प्रत्युत्तर म्हणून ऑपरेशन सिंदूर भारतीय सशस्त्र दलाने हाती घेतले. या ऑपरेशनमध्ये कुठेही निर्दोष नागरिकांना इजा होणार नाही याची काळजी घेतली गेली अशी माहिती भारतीय लष्कराच्या कर्नल सोफिया कुरैशी यांनी सांगितले.




नवी दिल्लीत भारतीय सैन्याने पत्रकार परिषद घेत हल्लूयाची सविस्तर माहिती दिली. या हल्लूयाबाबत भारतीय सैन्याच्या अधिकारी कर्नल सोफिया कुरैशी यांनी म्हटलं की, ऑपरेशन सिंदूर २२ एप्रिलला पहलगाम हल्लूयात बळी पडलेल्या निष्पाप नागरिकांना न्याय देण्यासाठी घेतले गेले. या कारवाईत ९ दहशतवादी ठिकाणे उद्ध्वस्त केली. मार्च २०२५ मध्ये जम्मू काश्मीर येथे ४ जवानांची हत्या केली होती. त्या दहशतवाद्यांना पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर ट्रेनिंग दिले होते. मुंबई दहशतवादी हल्लूयात सहभागी दहशतवादी तळांनाही ऑपरेशन सिंदूरमध्ये टार्गेट करण्यात आले असं त्यांनी सांगितले.

तसेच मरकज सुभानअल्लाह जैश ए मोहम्मदचं मुख्यालय होते. याठिकाणीही दहशतवाद्यांना ट्रेनिंग दिले जायचे. ऑपरेशन सिंदूरमध्ये कुठल्याही सैन्य ठिकाणांना टार्गेट केले नाही, कुठल्याही नागरिकाला इजा झाली नाही. मागील ३ दशकांपासून पाकिस्तान दहशतवादाला खतपाणी घालत आहे. तिथे दहशतवादी कॅम्प आणि लॉन्चपॅड्स बनवले होते. उत्तरेकडील सवाई नाला आणि दक्षिणेकडील बहावलपूर येथे जे आंतरराष्ट्रीय सीमेपासून १०० किमी अंतरावर आहे. तिथेही भारतीय सैन्याने हल्ला केला असं कर्नल सोफिया कुरैशी यांनी म्हटलं.

दरम्यान, हवाई दलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंह यांनीही पत्रकार परिषदेला संबोधित करत हल्लूयाची माहिती दिली. गुप्तचर यंत्रणेला मिळालेल्या माहितीनुसार ऑपरेशन सिंदूर आखण्यात आले. पाकिस्तानच्या मुजफ्फराबाद इथल्या लश्करच्या ट्रेनिंग सेंटरवर हल्ला करण्यात आला. दहशतवाद्यांनी याच ठिकाणी प्रशिक्षण घेतले होते. दहशतवाद्यांचे कंबरडे मोडण्यासाठी भारताने ही कारवाई केली. बरनाला कॅम्प, सियालकोट येथील महमूना कॅम्प नष्ट करण्यात आले आहे असं व्योमिका सिंह यांनी सांगितले.

# पाकिस्तान पिसाळला, शस्त्रसंधीचं उल्लंघन करत उखळी तोफा डागल्या, ७ भारतीयांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७जम्मू**

भारतात घुसखोरी करून पहलगाममध्ये पर्यटकांचे प्राण घेणाऱ्या दहशतवाद्यांवर भारताने जबरदस्त प्रहार केला. दहशतवाद्यांच्या आश्रयाची ठिकाणे असलेले तब्बल ९ ठिकाणे भारतीय लष्कराने उद्धवस्त केली. भारतीय लष्कराने मध्यरात्री केलेल्या या कारवाईनंतर पाकिस्तानचा थयथयाट सुरू झाला आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानी लष्कराने शस्त्रसंधीचे उल्लंघन करत भारतीय हद्दीतील गावांना लक्ष्य करत अंदाधूंद गोळीबार केला. यात तब्बल ७ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला आहे.




२२ एप्रिल रोजी पहलगाममधील बैसरन पठारावर झालेल्या हल्लूयानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर पावले उचलली आहेत. भारताने पाणी, व्यापार आणि टपाल सेवा बंद केली आहे. त्यामुळे पाकिस्तानची मोठी कोंडी झाली आहे. पहलगाम हल्लूयापासूनच पाकिस्तानच्या लष्कराकडून सातत्याने शस्त्रसंधीचे उल्लंघन करत गोळीबार केला जात आहे.

### ७ निष्पाप भारतीयांचा मृत्यू

जम्मू आणि काश्मिरातील आंतरराष्ट्रीय सीमेलगत असलेल्या गावांवर पाकिस्तानी लष्करांकडून उखळी तोफा डागण्यात आल्या. सीमेलगत असलेल्या गावांना पाकिस्तानी लष्कराने लक्ष्य केले. घरांवर गोळीबार करण्यात आला. उखळी तोफा डागण्यात आल्या. पाकिस्तानकडून अचानक करण्यात आलेल्या या गोळीबारामध्ये सात नागरिकांचा मृत्यू झाला आहे. यात एक महिला आणि दोन लहान मुलांचा समावेश आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. जम्मूतील पुंछ जिल्ह्यात ही घटना घडली आहे. पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या गोळीबारात २५ नागरिक जखमी झाले असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# गृह मंत्रालय अलर्ट! निमलष्करी दलांच्या सुट्ट्या रद्द; 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारत-पाकमधील तणाव वाढला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७नवी दिल्ली**

'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारतीय हवाई दलाने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर मोठा हल्लाबोल केला. या ऑपरेशननंतर आता भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव आणखी वाढला आहे. दरम्यान, गृह मंत्रालयाच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सर्व निमलष्करी दलांच्या सुट्ट्या तत्काळ रद्द करण्यात आल्या आहेत.




गृह मंत्रालयाने दिलेल्या आदेशानुसार, आता बीएसएफ, सीआरपीएफ, आयटीबीपी, एसएसबी आणि सीआयएसएफ सारख्या सर्व प्रमुख निमलष्करी दलाच्या जवानांना पूर्ण दक्षतेने कर्तव्यावर उपस्थित राहावे लागणार आहे. यासोबतच, सीमावर्ती भागांमध्ये आता अतिरिक्त ताफा तैनात करण्यात येणार आहे. गुप्तचर विभागाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तान आता चांगलाच बिथरला आहे. पाकिस्तानने या हल्लूयानंतर प्रत्युत्तर देण्याची धमकी देखील दिली आहे. मात्र, हा निर्णय दहशतवादी कारवाया रोखण्यासाठी घेण्यात आल्याचे बोलले जात आहे. या दरम्यान, जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थान सीमांवर आता अतिरिक्त जवान तैनात केले जात आहेत. रेल्वे स्थानके, विमानतळ, मेट्रो आणि संवेदनशील ठिकाणांवर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. केंद्रीय संस्था आणि राज्य पोलिसांनाही सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

# ऑपरेशन सिंदूरमध्ये दहशतवादी मसूद अजहरच्या कुटुंबातील १० जणांचा खात्मा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली**

भारताने पाकव्याप्त जम्मू काश्मीरसह पाकिस्तानातल्या दहशतवाद्यांच्या नऊ तळांवर मध्यरात्री जोरदार आक्रमण करत 'ऑपरेशन सिंदूर' ही मोहीम फत्ते केली. भारताने केलेल्या एअर स्ट्राईकमध्ये अनेक दहशतवादी मारले गेल्याची माहिती समोर आली आहे. २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम हल्लूयानंतर भारत नक्कीच मोठी कारवाई करेल याची कल्पना असताना भारतीय सैन्यानं अचूक वेळ साधत दहशतवाद्यांसह पाकिस्तानलाही धडा शिकवला आहे. अशातच या एअर स्ट्राईकच्या आघाताचे पडसाद समोर येत असताना या संदर्भात अतिशय महत्वाची माहिती समोर आली आहे. भारताच्या या हल्लूयात देशाचा सर्वात मोठा शत्रू असलेल्या मसूद अजहरच्या कुटुंबाचा खात्मा करण्यात आला.




पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू काश्मीरमधील दहशतवादी तळांवर भारतीय हवाई दलाने हल्ला करत दहशतवाद्यांच्या तळांना लक्ष्य केलं. यातील एका तळावर वास्तव्यास असलेल्या मसूद अझहरच्या कुंबातील १० तर निकटवर्तीय असलेल्या ४ सदस्यांचा मृत्यू झाला. या हल्यात मसूद अझहरचा भाऊ रौफ असगर हा गंभीर जखमी झाला आहे. तर ठार झालेल्यांमध्ये मसूद अझहरचा भाऊ आणि भारताचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी रौफ असगरचा मुलगा हुजैफा यांचा देखील समावेश असल्याची माहिती पुढे आली आहे.

# 'यावेळी पुरावा मागायला जागा नाही', ऑपरेशन सिंदूरची स्तुती करताना मुख्यमंत्री फडणवीसांचा विरोधकांना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

भारतीय हवाई दलाने मध्यरात्री एअर स्ट्राईक करत पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्लूयाला चोख प्रत्युत्तर दिले. पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरच्या हद्दीत एअर स्ट्राईक करून नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले. या कारवाईनंतर संबंध देशभरातून समाधान व्यक्त केले जात आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या कारवाईवर आनंद व्यक्त केला असून भारतीय सैन्यदल आणि पंतप्रधान मोदींचे अभिनंदन व्यक्त केले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतीय हवाई दलाने एअर स्ट्राईक करत दहशतवाद्यांचे नऊ अड्डे उध्वस्त केले आहेत. या कारवाईचे संपूर्ण शुटिंग करण्यात आले असल्यामुळे यावेळी कुणाला पुरावा मागण्याकरिता जागाच उरली नाही. मला असे वाटते की, सर्व भारतीयांकरिता अभिमानाचा असा हा दिवस आहे. आमच्यावर झालेला हल्ला भारत सहन करणार नाही. भारत योग्य पद्धतीने बदला घेईल, हे आपण दाखवून दिले आहे. ऑपरेशन सिंदूर हे नाव अधिक बोलके आहे, असे मला वाटते.

संपादकीय ......

# बारावीचा धडा!

विद्यार्थ्यांसाठी बारावीची परीक्षा महत्त्वाची मानली जाते. या गुणांच्या आधारावर त्यांच्या करिअरचा पाया उभा राहतो. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल यंदा गेल्यावर्षीच्या तुलनेत घसरलेला आहे. राज्याचा एकूण निकाल ९१.८८ टक्के लागला असून, गेल्यावर्षीपेक्षा तो १.४९ टक्क्यांनी कमी आहे. कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबवल्यामुळे त्याचा निकालावर स्पष्ट परिणाम जाणवत आहे. याचा अर्थ, राज्यात कॉपी करण्याचे प्रमाण भरपूर आहे. कॉपी करून मिळवलेल्या यशाला कोणताही अर्थ नसतो, हे शिक्षकांनी व पालकांनी विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले पाहिजे.

यावेळी नेहमीप्रमाणे मुलांपेक्षा उत्तीर्ण झालेल्या मुलींचे प्रमाण ५.०७ टक्के अधिक आहे. अर्थात, मुली दहावी काय, बारावी काय, नेहमीच बाजी मारत असून, याचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. मराठीस अभिजात दर्जा मिळाला असून, या पार्श्वभूमीवर मराठी विषयात प्रावीण्य मिळवणार्यांचे शासनातर्फेही खास कौतुक झाले पाहिजे. वसईच्या ऋषी वाल्मीकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातून परीक्षेस बसलेले ७६ वर्षीय गोरखनाथ मोरे हेही उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी लेखी परीक्षा तर दिलीच शिवाय तोंडी परीक्षाही चांगल्याप्रकारे दिली होती. शिक्षणाला वयाचे कोणतेही बंधन नसते, हे खरे! यंदा व्यवसाय अभ्यासक्रम आणि आयटीआयचा निकालही गेल्यावर्षीच्या तुलनेत घटला.

विज्ञान व वाणिज्य शाखेचे विद्यार्थी उत्तीर्ण होण्याचे प्रमाण फारसे बदलेले नाही. कोकण विभागाचा निकाल सलग १४व्या वर्षी सर्वाधिक असून, अन्य विभागांनी या यशाच्या पॅटर्नचा अभ्यास केला पाहिजे. कोकण विभागात शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात समन्वय चांगला असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाला प्रोत्साहन मिळते. कोकणात पारंपरिक शिक्षण पद्धती व आधुनिक शिक्षण यांचा समन्वय साधला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धोंडो केशव कर्वे आणि पां. वा. काणे या तीन 'भारतरत्न'प्राप्त व्यक्ती कोकणातीलच. एकेकाळी शिक्षणाच्या लातूर पॅटर्नचे खूप कौतुक होत असे; पण यावेळी लातूरचा निकाल सर्वात कमी लागला.एखाद्या पॅटर्नची प्रशंसा झाल्यानंतर काही व्यापारी प्रवृत्ती त्याचा फायदा घेतात. शिवाय शिक्षणात कोणताही शॉर्टकट नसतो. शिक्षणाचे अतिव्यापारीकरण धोकादायक असते. गेल्यावर्षी चौथ्या क्रमांकावर असलेल्या कोल्हापूर विभागाने यावेळी दुसर्या स्थानावर मजल मारली असली, तरी निकालात ०.६० टक्क्याने घसरण झाली; पण कोल्हापुरातील मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण मुलांपेक्षा ६.२१ टक्क्यांनी जास्त असून, हे अभिनंदनीयच! कोल्हापूर विभागात कॉपीमुक्त अभियान शंभर टक्के यशस्वी झाले. मुंबई विभागाने तिसरा क्रमांक पटकावला असून, त्यातही रायगडने बाजी मारली. रायगडमधील वाढलेल्या पायाभूत सोयी आणि शैक्षणिक सोयी–सुविधा आणि अध्यापन कौशल्यावर दिलेला भर याचा हा परिणाम आहे; मात्र मुंबई विभागात दक्षिण मुंबईचा निकाल सर्वात कमी लागला, हे धक्कादायक आहे.

दक्षिण मुंबई ही शहरातील मुख्यतः धनिकवनिकांची वस्ती. कला शाखेचा निकाल ५.३६ टक्क्यांनी घटला असून, ही चिंतेची बाब आहे. मुंबईत ९० टक्क्यांहून जास्त गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढल्यामुळे पदवीच्या प्रथम वर्षासाठी नामांकित महाविद्यालयांतील प्रवेशासाठी चुरस निर्माण होणार आहे. बारावीच्या विद्यार्थ्यांवर वर्षभर मेडिकल, इंजिनिअरिंग अशा विविध प्रवेश परीक्षांच्या अभ्यासाचेही ओझे असते. केवळ बारावीत उत्तम गुण मिळवणे पुरेसे ठरत नाही, हेही एक वास्तव आहे. जीवनात कला, साहित्य, सामाजिक शास्त्रे यांना महत्त्व असून, त्या क्षेत्रातही उत्तम करिअर होऊ शकते, हे बिंबवण्यात शिक्षण व्यवस्था आजही कमी पडते, हे लक्षात घेतले पाहिजे.यंदाही मुलींनी लखख यश मिळवत मारलेली बाजी उल्लेखनीय ठरली. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण महाराष्ट्रात गाजले होते. पित्याच्या हत्येच्या दु:खात पोळून निघालेली त्याची कन्या वैभवी ही न्याय मागण्यासाठी जनतेसोबत अनेकदा रस्त्यावरील मोर्चांतही उतरली होती. एवढ्या संकटकाळातही या लेकीने बारावीच्या परीक्षेत ८५ टक्के मिळवून कमाल करून दाखवली. आज तुझे वडील असते, तर त्यांना आनंद झाला असता, तू अशीच प्रगती करत राहावेस, अशा शुभेच्छा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वैभवीला पत्राद्वारे दिल्या. मुंबईतील घाटकोपरच्या झुनझुनवाला महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेतील गायत्री पन्हाळकर हिने मराठी विषयात १०० गुण पटकावत या विषयात राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला.

तिचे वडील रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. घरची परिस्थिती बेताची असतानाही गायत्रीने मन लावून अभ्यास केला. तसेच नियमितपणे वृत्तपत्र वाचन सुरू ठेवले. सर्व शाखांमधील एकूण १ लाख १५ हजारांच्या आसपास विद्यार्थी नापास झाले. मुलाला परीक्षेत कमी गुण मिळाले वा मुलगा नापास झाला, तर पालक निराश होतात. काही मुले आत्महत्या करतात, तर अनेकांचे मानसिक संतुलन बिघडते. अपयशाचा बाऊ न करता ते पचवण्याची तयारीही ठेवली पाहिजे. राष्ट्रपिता महात्मा गांधी, अलबर्ट आईनस्टाईन, विन्स्टन चर्चिल, लोकमान्य टिळक, रामानुजन, जे. कृष्णमूर्ती, कुसुमाग्रज, यशवंतराव चव्हाण, आर. के. लक्ष्मण, गुलजार, शांता शेळके अशी अनेक थोर माणसे कोणत्या ना कोणत्या विषयात नापास झालेली होती.शालेय वा महाविद्यालयीन जीवनात प्रतिकूलता येऊनही त्यांनी प्रयत्नपूर्वक त्यावर मात केली. आपापल्या क्षेत्रात व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवला. ज्यांना कमी गुण मिळाले वा जे नापास झाले, त्यांनीही सकारात्मक दृष्टिकोन ठेवला पाहिजे. आत्मविश्वास सर्वात मोठे शस्त्र असते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हवाई दलाच्या परीक्षेत नापास झाले होते; पण त्यांनी आपले स्वप्न काही सोडले नाही. शास्त्रज्ञ म्हणून ते जगद्विख्यात झालेच शिवाय राष्ट्रपती झाल्यानंतर ते सर्वोच्च कमांडर बनले आणि त्यांनी विमान उडवण्याचे ६ महिने प्रशिक्षण घेतले. त्यानंतर भारतीय हवाई दलाचे सुखोई विमान त्यांनी उडवले. प्रचंड इच्छाशक्तीच्या बळावर आयुष्याला सुंदर वळण देता येते, हाच विद्यार्थ्यांनी घ्यायचा धडा आहे.

# खरीप हंगामापूर्वी 'हे' एक काम करा अन् यंदा खतांचा अतिरिक्त खर्च टाळा

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

खरीप हंगामाची तयारी करताना बहुतेक शेतकरी खतांची खरेदी अगोदरच करतात. यामागचं प्रमुख कारण म्हणजे वेळेवर खतांच्या किमतीत होणारी वाढ. मात्र अनेक वेळा




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष


शेतकरी अंदाजाने किंवा पारंपरिक सवयीप्रमाणे खते खरेदी करतात आणि ती जमिनीत टाकतात. यामुळे खतांचा खर्च तर वाढतोच पण जमिनीवर त्याचा विपरीत परिणाम देखील होतो.प्रत्येक शेताची माती वेगळी असते आणि तिच्यातील पोषणद्रव्यांचे प्रमाणही वेगळं असतं. काही जमिनींत नत्र जास्त असतो, काहींमध्ये स्फुरद कमी असतो, तर काही जमिनींत सेंद्रिय घटक फारच कमी प्रमाणात असतात. जर आपण ही माहिती न घेता सगळ्या खतांचा वापर सरसकट केला तर काही अन्नद्रव्यांची जमिनीत जास्तीची मात्रा होते आणि काही वेळेस काही घटकांचा अभाव राहतो. खतांचा अतिरेक झाल्यास जमिनीचा पोत बिघडतो. उदा. नत्राचं अति प्रमाण जमिनीत असल्यास मुळे जास्त फुटतात, पण फळधारण कमी होते. स्फुरदाची कमतरता असल्यास मुळांची वाढ खुंटते. शिवाय खते योग्य प्रमाणात न दिल्यास कीटक व रोगही पिकांवर लवकर आढळतात.या सर्व गोष्टी टाळायच्या असतील तर माती परीक्षण करणे गरजेचे आहे. माती परीक्षण केल्याने जमिनीत कोणते अन्नद्रव्य किती प्रमाणात आहे. कोणती खते द्यावीत ? किती प्रमाणात द्यावीत ? याची अचूक माहिती मिळते. त्यामुळे गरजेपेक्षा जास्त खते टाकण्याची गरज राहत नाही.परिणामी माती परीक्षण केल्यास शेतकऱ्यांचा खर्च वाचतो. तसेच खर्च कमी होतो, पिकांची गुणवत्ता वाढते, जमिनीचा पोत सुधारतो. तेव्हा यंदाच्या खरीप हंगामापूर्वी शेतकऱ्यांनी जमिनीचं आरोग्य तपासावं आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल करावी.माती परीक्षण हा खर्च नव्हे तर गुंतवणूक आहे. त्यामुळे विक्रेत्यांकडून खतांच्या ठरवून टंचाई सदृश स्थिती निर्माण करून किमती वाढविण्याआधी माती तपासणी करून गरजेनुसारच खते खरेदी करा आणि खर्चावर नियंत्रण ठेवा.

आरोग्य संपदा आहार विशेष

## उन्हाळ्यात खरबूज खाण्याचे ६ जबरदस्त फायदे!

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

टरबूज, खरबूज ही अस्सल उन्हाळी फळं. यात बहुतांश जणांना टरबूज आवडतं. पण खरबुजाकडे मात्र पाठ फिरवली जाते. पण टरबुजाएवढेच खरबूजसुद्धा गुणकारी असून काही विशिष्ट आजारांमध्ये तर ते अतिशय गुणकारी ठरते.



खरबूज हे थंड फळ आहे. त्यामुळे या दिवसांत होणारी पोटाची आग कमी करून शरीर थंड ठेवण्यासाठी ते उपयोगी ठरतं.बीपीचा त्रास असणाऱ्या व्यक्तींना उन्हाळ्याच्या दिवसांत खूप तगमग होतं. त्यांची अस्वस्थता कमी करण्यासाठी त्यांनी खरबूज खायला हवं, अशी माहिती डॉ. सिराज सिद्दीकी यांनी दिलेली माहिती न्यूज १८ ने प्रकाशित केली आहे. खरबूज नियमितपणे खाल्ल्यामुळे बीपी नियंत्रित राहण्यास मदत होते.

खरबुजामध्ये पोटॅशियम भरपूर प्रमाणात असते. पण ज्या लोकांना किडनीसंबंधित त्रास असतो त्यांनी १५० ते २०० ग्रॅम एवढ्याच प्रमाणात टरबूज खावं. त्यापेक्षा अधिक खाणं त्यांच्या तब्येतीसाठी चांगलं नाही.

खरबूजमध्ये भरपूर प्रमाणात पाणी असतं. त्यामुळे उन्हाळ्यात होणारा डिहायड्रेशनचा त्रास कमी करण्यासाठी खरबूज खाण्याचा सल्ला दिला जातो.खरबुजामध्ये प्रोटीन्स, कार्बोहाइड्रेट्स, फॉस्फरस, लोह, फाइबर, मॅग्नेशियम, झिंक, सोडियम यासोबतच इतरही कित्येक प्रकारचे व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स असतात.

एंटीऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असल्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठीही खरबूज उपयुक्त ठरतं.

# त्यांनी आमचे कुंकू पुसले, मोदींनी ऑपरेशन सिंदूरने उत्तर दिले; जगदाळे कुटुंबाने मानले आभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली–**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. यानंतर देशभरात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. पाकिस्तावर कठोर कारवाई करत या हल्ल्याचा बदला घ्यावा, अशी जनभावना होती. पहलगाम हल्ल्याच्या १५ दिवसानंतर भारताने पाकिस्तानवर एअर स्ट्राइक करून प्रत्युत्तर दिले. दहशतवाद्यांच्या ९ ठिकाणी एअर स्ट्राइक करून दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. या मोहिमेला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव देण्यात आले. या एअर स्ट्राइकनंतर जगभरातून प्रतिक्रिया येत असून, भारताने केलेल्या कारवाईचे अनेक देशांनी समर्थन केले आहे. यातच पहलगाम हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या संतोष जगदाळे यांच्या कुटुंबाने या प्रत्युत्तराबाबत पंतप्रधान मोदी यांचे आभार मानले आहेत.

ऑपरेशन सिंदूर केले आहे, त्यातून त्यांनी त्या हल्ल्यातील सर्वांना श्रद्धांजली वाहिली आहे. त्यांनी या मोहिमेला ऑपरेशन सिंदूर हे नाव दिले, त्यासाठी मी त्यांची आभारी



आहे. पंतप्रधान मोदी यांनी आमच्या भावना जाणून घेतल्या. आमच्या समोरच आमचे कुंकू त्या दहशतवाद्यांनी पुसले. गोळ्या घालून त्यांनी माझ्या नवऱ्याला मारले. पंतप्रधान मोदींनी ऑपरेशन सिंदूर हे नाव देऊन त्या दहशतवाद्यांच्या तळावरती हल्ला केला. अतिशय योग्य आहे. हा धडा त्यांना देणे गरजेचे होते. मला खात्री होती की, आम्ही मोदींच्या मुली आहोत, ते त्यांच्या मुलींना समजून घेतील. उरी हल्ला करून आम्ही असे करू शकतो, हे त्यांनी दाखवून दिले होते. आताही मला खात्री होती की, थोडा वेळ घेतील पण ते हल्ला करतील, अशी प्रतिक्रिया संतोष जगदाळे यांच्या पत्नीने दिली. दरम्यान, भारताने दहशतवादाविरोधात मोठी कारवाई करत मंगळवारी रात्री दीडच्या सुमारास ९ दहशतवादी ठिकाणे उद्ध्वस्त केली. तिन्ही सैन्य दलाने मिळून ही संयुक्त कारवाई केली. भारताच्या धाडसी सैन्याने पाकिस्तानच्या ४ आणि पीओकेमध्ये ५ ठिकाणी एकाचवेळी टार्गेट केले. भारतीय गुप्तचर यंत्रणा ठ–थ ने हे सर्व टार्गेट निश्चित केले होते. ज्यानंतर पूर्ण कारवाईने लश्कर आणि जैशच्या ठिकाणांवर हल्ला करण्यात आला.

### ही २६ जणांना श्रद्धांजली, सरकारचे आभार

आज खऱ्या अर्थाने माझ्या वडिलांना सरकारकडून श्रद्धांजली मिळाली असे वाटते आहे. पंधरा दिवसात मिशन पूर्ण केले. मी सरकारचे आभार मानते, ज्या २६ जणांचा मृत्यू झाला होता. त्यांना आज श्रद्धांजली मिळाली आहे, असे मृत संतोष जगदाळे यांच्या कन्येने म्हटले आहे.

# आज तोच विश्वास सार्थ ठरवत, भारतीय हवाई दलाने..., शरद पवारांनी लष्करांचं केलं अभिनंदन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई–** पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पहिला वार केला. पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या ठिकाणांना लष्कराने उद्ध्वस्त केलं. भारतीय लष्कराने मध्यरात्री यशस्वीपणे ऑपरेशन सिंदूर पूर्ण केले. भारताने केलेल्या या कारवाईचे शरद पवारांनी अभिनंदन केले आहे. शरद पवारांनी एक पोस्ट करत लष्करांने केलेल्या कारवाईचे कौतुक केले. शरद पवारांनी सोशल मीडियावर एक पोस्ट लिहिली आहे. यात त्यांनी भारतीय लष्कारांच्या कर्तृत्वान इतिहासाला उजाळा देत अभिनंदन आणि अभिमान व्यक्त केला आहे. शरद पवारांनी म्हटलं आहे की, आपल्या छातीवर गोळ्या झेलून भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणाऱ्या भारतीय सैन्यदलावर प्रत्येक भारतीयाचा पूर्ण विश्वास आहे. आज तोच विश्वास सार्थ ठरवत, भारतीय हवाई दलाने मध्यरात्री दीडच्या सुमारास अतिरेक्यांच्या नऊ ठिकाणांवर यशस्वी एअर स्ट्राईक करून, पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला.

संपूर्ण देशाला सैन्याच्या कामगिरीचा अभिमान

या कारवाईत पाकिस्तानी नागरिक किंवा पाक लष्कराच्या कोणत्याही ठिकाणाला धक्का न लावता, अतिरेक्यांच्या नऊ लक्ष्यांवर अचूक आणि नियोजित हल्ला करण्यात आला. भारतीय सैन्याच्या या शौर्यपूर्ण कामगिरीचा संपूर्ण देशाला अभिमान आहे, अशा भावना शरद पवारांनी व्यक्त केल्या आहेत.

# मॉक ड्रिल करण्यासाठी राज्य झाले सज्ज, सर्व यंत्रणांना मिळाल्या सतर्कतेच्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई :**

केंद्र सरकारने जाहीर केल्यानुसार बुधवारी राज्यात १६ शहरांत मॉक ड्रिल घेण्यात येईल. त्यासाठी नागरी संरक्षण दलाचे १० हजार स्वयंसेवक रस्त्यावर असतील. तसेच एनसीसीचे विद्यार्थी, डॉक्टर्स आणि परिचारिकाही मदतीला असतील, अशी माहिती नागरी संरक्षण दलाचे संचालक प्रभात कुमार यांनी दिली.

मॉक ड्रिलमध्ये हवाई हल्ल्याचा इशारा देणारे सायरन आणि ब्लॅकआउट (वीज बंदी) परिस्थितीला कसा प्रतिसाद द्यावा, यावर भर असेल. आपत्कालीन परिस्थितीत मोबाइल आणि डिजिटल व्यवहार अयशस्वी ठरू शकतात. अशा परिस्थितीत तोंड देण्यासाठी आवश्यक रोख रक्कम जवळ ठेवण्याचे निर्देशही जनतेला देण्यात येणार आहेत. याशिवाय घरी वैद्यकीय किट, अतिरिक्त औषधे मेणबत्त्या ठेवण्याचे निर्देश दिले जातील.

**ही आहेत संभाव्य ठिकाणे**

मुंबई, उरण–जेएनपीटी, तारापूर, पुणे, ठाणे, नाशिक, थळ–वायशेत, रोहा–धाटाव–नागोठाणे, मनमाड, सिन्नर,



पिंपरी–चिंचवड, संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या शहरांचा या मॉक ड्रिलमध्ये समावेश आहे.

### हालचालींना गती

राज्य प्रशासनाने यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्य शासनाने अंतर्गत स्तरावर हालचालींना गती दिली असून, सर्व पालकमंत्र्यांसह इतर मंत्र्यांना प्रशासनाशी संपर्कात राहण्याचे आदेश दिले आहेत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ७ मे २०२५

शहर/ग्रामिण


# यशवंत पंचायत राज अभियान अमरावती जिल्हा परिषद राज्यात दुसरी

## विभागात धारणी व्दितीय तर अचलपुर तिसरा जाहिर

### ग्राम विकास विभागाकडून पुरस्काराची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–** ग्राम विकास विभागाकडून राबविण्यात आलेल्या यशवंत पंचायत राज अभियानातील पुरस्कारा – ची मंगळवारी घोषणा कण्यात अमरावती आली. जिल्हा परिषदेने यामध्ये राज्यातून दुसरा क्रमांक पटकाविला आहे.

तर विभागात धारणी पंचायत समितीला व्दितीय तर अचलपुर पंचायत समितीला तिसरा पुरस्कार मिळाला आहे. राज्यातील अत्युत्कृष्ट जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांना महसूली विभागस्तरीय व राज्यस्तरीय पुरस्काराकरिता नामांकन करण्यात आले होते. याअंतर्गत जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची समितीकडून तपासणी करण्यात आली. याचा निकाल मंगळवारी ग्राम विकास विभागाने जाहिर केला. राज्यात पंचायत राज संस्थांचे व्यवस्थापन व विकास कार्यात अत्युत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींसाठी सन २००५–२००६ या आर्थिक वर्षापासून विभागस्तर व राज्यस्तरावर 'यशवंत पंचायत राज अभियान' ही पुरस्कार योजना सुरु करण्यात आलेली आहे. पंचायत राज प्रशासन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांनी सन २०२२–२३ या





आर्थिक वर्षामध्ये केलेल्या कामाचे मूल्यमापनविचारात घेऊन अमरावती झेडपीला...घेऊन महसुली विभागस्तर व राज्यस्तर अशा दोन स्तरावर यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान अभियानांतर्गत राज्यातील अत्युत्कृष्ट तीन जिल्हा परिषदा व तीन पंचायत समित्यांची पुरस्कारासाठी राज्यस्तरावर निवड करण्यात आली.

पंचायत राज प्रशासन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांनी सन २०२२–२३ या आर्थिक वर्षामध्ये केलेल्या कामाचे मूल्यमापन राज्यस्तरीय पुरस्कारामध्ये राज्यात सीईओ संजिता महापात्र यांच्या मागदर्शनात अमरावती जिल्हा परिषदेने दुसरा क्रमांक पटकाविला आहे. राज्यात पंचायत समित्यांना यश आले नसले तरी विभागात मात्र दोन पंचायत समित्यांनी पुरस्कार पटकाविला आहे. यामध्ये धारणी व्दितीय व अचलपूर पंचायत समितीला तिसरा क्रमांक मिळाला आहे. त्यामुळे सीईओ संजिता महापात्र यांनी अधिकारी व पंचायत समित्यांच्या अधिकाऱ्यांचे कौतुक केले आहे.

# २०१७ च्या आरक्षणानुसार मनपाचा ८७ जागासाठी रणसंग्राम

## ओबीसी –२३, एससी–१५, एसटी–२ आणि ओपन–४७

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती** – कोरोना काळापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींना लवकरच मुहूर्त लागणार आहे. सुप्रीम कोर्टाने निवडणूक आयोगाला येत्या चार महिन्यात रखडलेल्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिले आहेत. तसंच चार आठवड्यांमध्ये निवडणुकीबाबत अधिसूचनाही काढण्याचे निर्देश देण्यात आले



आहेत. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे २०२२ पूर्वीच्या ओबीसी राजकीय आरक्षणासह या निवडणुका पार पडणार आहे. त्यामुळे अमरावती मनपाच्या २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीप्रमाणे ८७ जागासाठी मनपा रणसंग्राम रंगणार आहे. त्यात आरक्षणाचा विचार केल्यास ओबीसी – २३, एससी–१५, एसटी–२ आणि ओपन–४७ अशा एकूण ८७जागा राहतील.अमरावती महापालिका आणि जिल्हा परिषदेवर गेल्या तीन वर्षांपासून प्रशासकीय राजवट आहे.सुरुवातीला कोरोना, प्रभाग रचना आणि नंतर ओबीसींच्या आरक्षणाच्या मुद्द्यामुळे या निवडणुका लांबलेल्या होत्या.अमरावती मनपाच्या स्थितीचे अवलोकन केल्यास ८ मार्च २०२२ रोजी महापौर काळ संपुष्टात आला, आणि प्रशासकीय राजवट सुरु झाली. २०१७ ते २०२२ असा हा पाच वर्षाचा कालखंड होता. त्यानंतर गेल्या तीन चार वर्षापासून ओबीसी राजकीय आरक्षणाचे प्रकरण सुप्रीम कोर्टात असल्यामुळे तारीख पे तारीख करीत... आजपर्यंत निर्णय लांबणीवर पडला. अखेर तीन वर्षे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य प्रशासक राज राहिल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा २०२२ च्याआधी ज्या पद्धतीने निवडणुका घेतल्या जात होत्या. त्याच पद्धतीने म्हणजे ओबीसीच्या २७ टक्के आरक्षणासहनिवडणुका घेण्याचे आदेशदिले आहेत.

**महापालिका आयुक्त म्हणतात आम्ही निवडणुकांसाठी तयार**



सुप्रीम कोर्टाने दिलेले आदेश, तसेच शासन व निवडणूक आयोगाने दिलेल्या दिशानिर्देशानुसार निवडणूका होतील. शासन निर्णय, वा निवडणूक आयोगाचे जसे आदेश मिळेल, त्यानुसार मनपाची प्रशासकीय यंत्रणा मनपाच्या निवडणुका घेण्यासाठी आम्ही सर्व सज्ज आहोत.

**– सचिन कलंत्रे, मनपा आयुक्त**

**अमरावती मनपात ८७ नगरसेवक**

२१ फेब्रुवारी २०१७ रोजी महापालिकेची अखेरची निवडणूक झाली होती. तब्बल आठ वर्षांनंतर महापालिकेची निवडणूक होणार आहे. गेल्या निवडणुकीत एकूण ८७ जागांपैकी भाजपला सर्वाधिक ४५, कॉंग्रेसला १५, शिवसेना ७, बसप ५ , एमआयएम १०, वायएसपी ३ रिपाई १, अपक्ष १ जागा मिळाल्या होत्या.

# शहर पोलिस ९ मे रोजी शहरातील प्रमुख भागांमध्ये मॉक ड्रिल करणार

## जिल्ह्यात पाकीस्तान व बांग्लादेशी घुसखोरांची शोधमोहिम सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती** भारत–पाकचे युध्द सुरू झाल्यानंतर शहरांवर हल्ला झाल्यास नागरिकांना स्वतःच्या बचावासाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ७ मे रोजी देशभरात मॉक ड्रिल घेण्याचे आदेश केंद्रीय गृह मंत्रालयानं दिले आहेत. मॉक ड्रिलच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या श्रेणीत अमरावती जिल्हयाचा समावेश नसला तरी शहर व ग्रामीण पोलिस हायअर्लटवर आहेत. शहर व ग्रामीण भागात युध्दपातळीवर पाकीस्तान व बांग्लादेशी घुसखोरांची शोधमोहिम सुरू आहे. तसेच जिल्ह्याच्या बॉर्डर सिलिंग पाईन्टवर वाहनांची कसून झडती घेण्यात येत आहे. या अनुषंगाने शहर पोलिस ९ मे रोजी शहरातील प्रमुख भागांमध्ये मॉक ड्रिल करणार आहे.

देशासह महाराष्ट्रात यापूर्वी १९७१ मध्ये मॉक ड्रिल झालं होतं. त्यावेळी भारत–पाकिस्तान युद्ध झालं होतं.



त्यावेळी शहरांमध्ये सायरन वाजवण्यात आले होते. ब्लॅकआऊटचाअभ्यास आणि लोकांना सुरक्षित राहण्याच्या सूचना दिल्या गेल्या. आपत्कालीन स्थितीत काय करायचं याची माहिती नागरिकांना देण्यासाठी मॉक ड्रिलचं आयोजन करण्यात येतं. युद्धाच्या परिस्थितीत जीव वाचवण्यासाठी कोणत्या कृती करायच्या, कोणत्या कृती टाळायच्या याची माहिती मॉक ड्रिलच्या माध्यमातून दिली जाते. केंद्र सरकारच्या आदेशानंतर राज्य सरकार अलर्ट मोडवर आहे. राज्य प्रशासनानं सगळ्या संबंधित यंत्रणांना अलर्टवर राहण्याचे निर्देश दिले आहेत. मंत्र्यांना प्रशासनाशी समन्वय राखण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. केंद्र सरकारनं मॉक ड्रिल करणाऱ्या ठिकाणांचे तीन श्रेणीत वर्गीकरण केलं आहे. मॉक ड्रिलच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या श्रेणीत अमरावतीचा समावेश नसला तरीपोलिस हायअर्लटवर आहेत. शहर व ग्रामीण भागात युध्दपातळीवर पाकीस्तान व बांग्लादेशी घुसखोरांची शोधमोहिम तसेच जिल्ह्याच्या बॉर्डर सिलिंग पाईन्टवर वाहनांची झडती घेण्यात येत आहे. शहर पोलिस ९ मे रोजी शहरातील प्रमुख भागांमध्ये मॉक ड्रिल होईल.

**पाकिस्तानी नागरिकांची माहिती द्यावी – नविनचंद्र रेड्डी पोलीस आयुक्त**



मॉक ड्रिलमध्ये अमरावती जिल्ह्याचा समावेश नसला तर शहर पोलिस हाय अर्लटवर आहेत. शहरात सध्याघडीला लॉगटर्म विझाचे ११८ पाकिस्तानी नागरिक आहेत. त्यांना शहराबाहेर काढण्याबाबत कोणतेही आदेश नाही. शॉट टर्म विझावाला एकही पाकिस्तानी नागरिक शहरात नाही.छुप्या पध्दतीने पाकिस्तानी किंवा बांग्लोदशी नागरिक राहत असेल तर त्याची माहिती द्यावी. पोलिसांनी कसून शोधमोहिम सुरू असल्याची प्रतिक्रिया सीपी नविनचंद्र रेड्डी यांनी दिली.

# महाविद्यालयीन तरुणाची चाकुने भोसकुन हत्या

## राजापेठ हद्दीतील ज्योती कॉलनीमधील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ज्योती कॉलनीमध्ये राहणाऱ्या एका २२ वर्षीय महाविद्यालयीन तरुणाची चाकुने भोसकुन हत्या करण्यात आली. ही घटना मंगळवारी रात्री नऊ वाजताच्या सुमारास समोर आली. तरुणाच्या मारेकऱ्यांचा राजापेठ पोलिस शोध घेत आहेत.देवांशु अनिल फरताडे (२२, ज्योती कॉलनी, सिपना कॉलेज रोड, अमरावती) असे मृतक तरुणाचे नाव आहे. देवांशु हा मंगळवारी सांयकाळी घराच्या परिसरातच असलेल्या मोकळ्या मैदानात असताना त्याच्यावर तीन ते चार जणांनी चाकुने हल्ला चढवला. यावेळी त्याच्या पोटात चाकूचे घाव करण्यात आले. यातच तो रक्तबंबाळ झाला व त्याचा मृत्यू झाला. मारेकऱ्यांची नावे पोलिसांसमोर आली असून



त्यांचा शोध घेण्यासाठी राजापेठ पोलिसांचे पथकं रवाना झाले आहेत. देवांशुचा खुन कोणत्या कारणासाठी झाला याबाबत पोलिस माहीती घेत आहेत. घटनेची माहीती राजापेठ पोलिसांसह गुन्हे शाखेचे पथकही घटनास्थळी दाखल झाले होते. मारेकरी हे देवांशूच्या परिचित असावे, असा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. या घटनेने मात्र परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे.

# आनंद वार्ता : मान्सून १३ में पर्यंत अंदमानात येणार; हवामान विभागाची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३पुणे :–**मान्सून यंदा आठ ते दहा दिवस आधीच निघण्याच्या तयारीला लागला असून तो १३ मे पर्यंत अंदमान–निकोबार बेटांवर दाखल होईल असा प्राथमिक अंदाज मंगळवारी (दि.६) भारतीय हवामान विभागाने वर्तविला आहे. त्यामुळे तो केरळात देखील वेळेआधीच दाखल होईल, अशी शक्यता आहे. मात्र, ती तारीख हवामान विभागाने घोषित केली नाही.

गत पन्नास दिवस देशभर उष्णतेची लाट सक्रिय होती. त्यामुळे हिंदी महासागर आणि बंगालच्या उपसागरातील पाणी प्रचंड तापले. बाष्पीभवनाचा वेग वाढल्याने संपूर्ण देशाभोवती बाष्पयुक्त ढग तयार झाले आहेत. त्यामुळे मान्सून तयारीला लागला आहे. मान्सून दरवर्षी अंदामान–निकोबार बेटावर १८ ते २२ मे च्या सुमारास येतो. मात्र तो यंदा



किमान आठ ते दहा दिवस आधीच अंदमान–निकोबार बेटावर येण्याच्या तयारीत आहे, असे सॅटेलाईटने टिपलेल्या हालचालीतून दिसत असल्याचे अंदाज हवामान शास्त्रज्ञांनी वर्तवले आहे. त्यामुळे तो केरळमध्ये सुद्धा किमान पाच ते सहा दिवस आधी दाखल होऊ शकतो, असे वरिष्ठ शास्त्रज्ञ सांगत आहेत. मात्र, याबाबत हवामान विभागाने अजून स्पष्ट दुजोरा दिलेला नाही.

राज्याच्या कमाल तापमानात मोठी घट होताना दिसत असून ४४ ते ४५ अंशावर गेलेले तापमान ४० अंशावर खाली आले होते. मंगळवारी अकोला येथे सर्वाधिक ४०.३ अंश तापमानाची नोंद झाली.

# श्रीनगरसह ११ विमानतळे बंद, एअर इंडियाने दुपारी १२ वाजेपर्यंत ९ शहरांना जाणारी सर्व उड्डाणे केली रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७जम्मू काश्मीर–** भारताने पाकिस्तानवर केलेल्या हवाई हल्ल्याचा देशभरातील विमान उड्डाणांवर परिणाम झाला आहे. श्रीनगरसह ११ विमानतळांवरील कामकाज बंद करण्यात आले आहे. यामध्ये जम्मू, श्रीनगर, लेह, चंदीगड, बिकानेर, जोधपूर, राजकोट, धर्मशाला, अमृतसर, भुज, जामनगर विमानतळांचा समावेश आहे. विमान प्रवास पूर्णपणे प्रभावित झाला आहे.

हवाई हल्ल्यानंतर विमान कंपन्यांनी ही माहिती दिली आहे. एअर इंडियाने सांगितले – जम्मू, श्रीनगर, लेहसह ९ विमानतळांवरील सर्व उड्डाणे आज दुपारी १२ वाजेपर्यंत रद्द करण्यात आली आहेत. विमान कंपन्यांनी प्रवाशांना त्यांच्या विमानाची स्थिती तपासल्यानंतरच विमानतळावर जाण्याची विनंती केली. हेल्पलाइन क्रमांक देखील जारी करण्यात आले आहेत.

विमान कंपन्यांचे निवेदन

इंडिगो: प्रदेशातील हवाई परिस्थितीतील बदलामुळे, श्रीनगर, जम्मू, अमृतसर, लेह, चंदीगड, बिकानेर आणि धर्मशाला येथे जाणाऱ्या आणि येणाऱ्या विमानांच्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. विमानतळावर जाण्यापूर्वी तुमच्या फ्लाइटची स्थिती तपासण्याची आम्ही तुम्हाला विनंती करतो.

स्पाइसजेट: ऑपरेशन सिंदूरमुळे, उत्तर भारतातील धर्मशाळा, लेह, जम्मू, श्रीनगर आणि अमृतसर सारखी काही विमानतळ पुढील सूचना मिळेपर्यंत बंद करण्यात आली आहेत. या विमानतळांवरून येणाऱ्या विमानांच्या आगमन आणि निर्गमन वेळेवर परिणाम



होऊ शकतो. प्रवाशांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या प्रवासाचे काळजीपूर्वक नियोजन करावे आणि स्पाइसजेटच्या वेबसाइटवर त्यांच्या फ्लाइटची स्थिती तपासावी.

एअर इंडिया: जम्मू, श्रीनगर, लेह, जोधपूर, अमृतसर, भुज, जामनगर, चंदीगड आणि राजकोटला जाणारी आणि येणारी सर्व उड्डाणे ७ मे रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत रद्द. अधिकाऱ्यांना भेटल्यानंतर अधिक माहिती दिली जाईल. अमृतसरला जाणारी दोन आंतरराष्ट्रीय विमाने दिल्लीकडे वळवण्यात आली. या अचानक झालेल्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत. प्रवाशांच्या सोयीसाठी, ०११-६९३२९३३३ / ०११-६९३२९९९९ हे हेल्पलाइन क्रमांक आहेत.

एअर इंडिया एक्सप्रेस – अमृतसर, जम्मू, श्रीनगर आणि हिंडनला जाणाऱ्या आणि जाणाऱ्या विमान कंपन्या ७ मे रोजी दुपारपर्यंत रद्द करण्यात आल्या आहेत. गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत. सर्व प्रवाशांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या फ्लाइटची स्थिती तपासावी. फ्लाइटशी संबंधित सूचना आणि सूचनांसाठी टियाशी चॅट करा: +९१ ६३६०० १२३४५


शेतकरी ते थेट ग्राहक

**कामधेनु नॅचरल्स**

उत्तम आहार सर्वोत्तम जीवन

विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी

समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती

नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# मनपाचा अमरावतीकरांच्या सेवेत डिजीटल मोबाईल ॲप

## मनपा अयुक्त सचिन कलंत्रेचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–** बदलत्या काळानुरूप आजचे संगणकिय काळात सोशल मिडियाचे जगतात महाराष्ट्र शासनाचे मार्गदर्शक आदेशाप्रमाणे मनपा आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांचे सकारात्मक विचारांतून मनपा अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, सर्वच विभाग प्रमुख आणि, संबंधित तमाम अधिकारी, कर्मचारी, अभियंता, आणि, सिस्टीम मॅनेजर यांनी केलेल्या प्रयत्नांतून अमरावतीकरांकरिता उपलब्ध केलेल्या डिजिटल मोबाईल प सेवेकरिता मंगळवारी दै. वृत्त केसरीचे संपादक व दै. प्रतिदिन अखबारचे संचालक जयराम आहूजा, चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष विनोद कलंत्री, सीपीडीएचे राज्य सचिव शाम शर्मा यांचे हस्ते मनपा आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.महापालिकेने जनसोयी सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता लॉन्च केलेले मोबाईल ॲप, क्यू आर कोड, आणि सचिन कलंत्रे यांचे फोटो केकवरच प्रतिबिबित करण्यात आले होते. आशादिप फाऊंडेशन आणि शौर्य रुद्राक्ष ढोल पथक तर्फे तयार केलेला केक यावेळी सर्वांचे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला होता. एम.एच.–२७–एटीएस ग्रुप्स, आशादिप फाऊंडेशनतर्फे सचिन कलंत्रे यांचे अभिनंदन व सत्कार करून आभार व्यक्त करतेवेळी मान्यवर माजी उपमहापौर प्रमोद पांडे, प्रा. समिर चौधरी, समर्थ शाळेचे मुख्याध्यापकधनंजय पाठक, मराठी विज्ञान परिषद अध्यक्ष प्रा.प्रविण गुल्हाने, प्रा.आनंद केने, स्केटिंग टिचर मिलिद सराफ, यावेळी हजर होते. मनपा क्षेत्रातील नागरिकांच्या



तक्रारिचे, समस्यांचे निवारण सहजरित्या व्हावे. याकरिता, मनपाने विविध सेवांकरिता डिजिटल पद्धतीने अधिकृतरित्या मोबाईल ॲपद्वारे क्यू आर कोड आणि, मोबाईल डिजिटल सेवा सुरू केली असून या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग, वापर अधिकाधिक नागरिकांनी आणि, त्यातही विशेषतः महिला भगिनींनी, सोबतच, प्रत्येकच अमरावतीकर नागरिकांनी लाभघ्यावा. असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांनी सत्कार प्रसंगी व्यक्त केले. नागरिक सोयी सुविधा करिता, मनपाने सुरू केलेल्या अधिकृत मोबाईल ॲप मार्फत तक्रार नोंदविणे, नोंद केलेल्या तक्रारींचा प्रवास माहिती करणे, समस्या निराकरण कार्यवाहीची स्थिती तपासणे ? तसेच, अन्य विविध सेवांची व योजनांची माहिती प्राप्त करणे, करिताचे फारच सहज, सोपे असणारे व वाटणारे अल्पसे प्रशिक्षण ओन क्र.२ आणि ३ अंतर्गतचे प्रभाग क्रमांक १०/११/१८/२० येथील जागरूक, मोबाइल धारक नागरिकांना देण्यात यावे, जेणेकरुन संपुर्ण माहितीसह जागरूकता वाढीस लागेल, असे निवेदन अंजली पांडे यांनी यावेळी दिले. आज ज्यांचे ज्यांचे हाती मोबाईल आहे ते ते जागरुक नागरिक अमरावतीचे सर्वांगीण समस्या सोडविण्या करिता, तक्रारींचे निवारण करण्यासाठी सर्वतोपरी सहजरित्या कर्तव्य पार पाडू शकतात. किबहुना, विकासकार्यात सहकार्य करू शकतात.एव्हढी व्यवस्था मनपा प्रशासक श्री सचिन कलंत्रे यांनी केल्याबद्दल तसेच, सर्वांगीणदृष्ट्या बऱ्यापैकी तूर्त, मनपा जागेवर आणण्याचे प्रयत्न करीत असल्याबद्दल त्यांचे अभिनंदन आणि आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक,उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक नगर रचना घनश्याम वाघाडे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, कार्यकारी अभियंता रविद्र पवार, दै. वृत्तकेसरी व दै. प्रतिदिनचे संपादक संचालक जयराम आहुजा, मराठी विज्ञान परिषदेचे प्रा. प्रविण गुल्हाने, प्रा. समिर चौधरी, चेम्बर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष विनोद कलंत्री, स्केटिंग टिचर मिलिद सराफ, छाया किशोर कडू, माजी झोन सभापती सौ. अंजली प्रमोद पांडे, समर्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक धनंजय पाठक, माहिती अधिकार कायदा तज्ञ व शिक्षक प्रा. सुधिर केने, आशादीप फाऊंडेशनचे संचालक आनंद दरणे, सुमित डाहाणे, सोनाली पाटणे, अनिरुद्ध क्षिरसागर, प्रतिक गुप्ता, छाया किशोर कडू, संध्या अवसरे, जयश्री निभोरकर, मोनाली आगाशे, संध्या अवसरे, वंदना भटकर, निलिमा केने, सेवानिवृत्त पोलिस चंद्रशेखर मांडवगडे, पृथ्वी पांडे, अमोल आगाशे, माहिती अधिकार कायदा तज्ञ तथा शिक्षक सुधिर केने, प्रमोद पांडे आणि एम.एच.–२७–एटीएस ग्रुप्स सदस्य यावेळी उपस्थित होते.–

# इतवारा बाजारातील बंद उड्डाणपुलाबाबत

## खा.वानखडे यांच्या कार्यालयात उद्या बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती –** इतवारा बाजार येथील बंद असलेल्या उड्डाणपुलाच्या कामाबाबतीत ८ मे रोजी ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांची बैठक खा बळवंत वानखडे यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील व शहरातील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत तसेच खा. बळवंत वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली जनता दरबार आयोजित करण्यात आलाहोता. याप्रसंगी पालकमंत्री माजी यशोमतीताई ठाकूर, शहराध्यक्ष बबलु शेखावत, जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख, माजी आमदार वीरेंद्र जगताप यांचे सह अनेक काँग्रेसचे नेते उपस्थित होते. यामध्ये जिल्ह्यातील शेकडो नागरिकांनी त्यांच्या समस्या जनता दरबारामध्ये मांडल्या. जनता दरबारामध्ये अमरावती जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर संबंधित अधिकारी व विभागा सोबत संवाद व समन्वय साधून अमरावती मधील शेकडो नागरिकांच्या समस्या निकाली काढण्याचा प्रयत्न याप्रसंगीकरण्यात आला. अमरावती शहरामधील मुस्लिम बांधवांनी शहरातील साफसफाई व इतवारा बाजार येथील बंद असलेल्या उड्डाणपुलाच्या कामाबाबतीत लगेच सोमवार ५ मे रोजी खासदार बळवंत





वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच शहराध्यक्ष बबलु शेखावत, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, प्रदेश चिटणीस आसिफ तवक्कल, अल्पसंख्यांक अध्यक्ष अब्दुल रफीक पत्रकार, ब्लॉक अध्यक्ष गुड्डू हमीद यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हैदरपुरा ईदगाह गेट रोड येथे महत्वाची बैठक झालीबैठकी दरम्यान इतवारा बाजार येथील बंद असलेल्या उड्डाणपुलाच्या कामाबाबतीत येत्या ८ मे रोजी उड्डाण पुलाच्या कामाचे ठेकेदार वसार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांची बैठक खा बळवंत वानखडे यांच्या जनसंपर्क कार्यालयावर आयोजित करण्यात आली आहे. शहरातील साफसफाईचा उडालेला बोजवारा याबाबतीत येत्या ३ ते ४ दिवसांत महानगरपालिका आयुक्त यांचे सोबत मनपा आयुक्त कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे. शहरातील व जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्या असतील तर त्यांनी आपल्या सर्व समस्या घेऊन दर सोमवारी अमरावती काँग्रेस भवन येथे होत असलेल्या जनता दरबारा मध्ये उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद सह १४ पंचायत समिती, १२ नगर पालिका निवडणुका ऑक्टोबर मध्ये!

## १५ मे नंतर आरक्षण आणि प्रभाग रचना कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–** जिल्ह्यात २०२२पासून जिल्हा परिषद, महापालिका, पंचायत समित्या व नगरपालिका तसेच नगरपंचायतींची मुदत संपली आहे. त्यामुळे ह्या स्थानिक स्वराज्य संस्था गत चार वर्षांपासून निवडणुकांच्या प्रतिक्षेत असताना सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी सुनावणी घेत येत्या चार महिन्यांत निवडणुका लावण्याचे आदेश दिले आहे.त्यामुळे जिल्ह्यात सप्टेंबर ते ऑक्टोंबर या दरम्यान जिल्हा परिषद, महापालिका, १४ पंचायत समित्या, १० नगरपालिका व २नगरपंचायतींच्या निवडणुका





लागण्याचे संकेत आहे.जिल्हा परिषदेची मुदत २० मार्च २०२२ रोजी संपुष्टात आली. दरम्यान याचं वर्षात ११ पंचायत समित्यांची देखील मुदत संपली तर २०२४ मध्ये यात तीन पंचायत समित्यांची भर पडली. त्यामुळे आता जिल्हा परिषदेसह १४ पंचायत समित्यांवर प्रशासक आहे. याशिवाय महापालिका आणि १० नगरपरिषदेवर देखील प्रशासक राज कायम आहे. चार नगरपंचायतींपैकी तिवसा आणि भातकुली येथे पदाधिकारी असल्याने त्या दोन नगरपंचायती वगळता २ नगरपंचायतींमध्ये निवडणुका लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने ४ महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश दिल्याने मेपासूनच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणुकांची लगीणघाई सुरू होणार आहे. १५ मे नंतर आरक्षण आणि प्रभाग रचना कार्यक्रम राबविण्याची शक्यता वर्तविली जात आहे. हा कार्यक्रम ३० जुन पर्यंत चालले. जुलै मध्ये मतदार यादी कार्यक्रम लागला तर तो ऑगस्ट पर्यंत चालेल. त्यामुळे सप्टेंबर किवा ऑक्टोंबर मध्ये या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणुका लागण्याची शक्यता आहे.–

# संचमान्यता शासन निर्णयाविरोधात शिक्षकांची मुंबई उच्च न्यायालयात याचिका

## १५मार्च २०२४ चा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती,** नवीन संचमान्यतेचा शासन निर्णय १५ मार्च २०२४ ला आव्हान देणाऱ्या २ याचिका अँड बालाजी शिदे यांच्याकडून दाखल केल्या. मुंबई येथे दोन्ही याचिकांची सुनावणी पार पडली. सिधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील शिक्षकांनी नवीन संचमान्यतेचा शासन निर्णय १५ मार्च २०२४ ला आव्हान देणाऱ्या याचिकेत शासनाला आहे ती परिस्थिती ठेवण्याचे उच्चं न्यायालयाचे अंतरिम आदेश आहेत.

याचिकेतील उपस्थित केलेले मुद्दे व युक्तिवाद विचारात घेऊन मंगळवारी उच्च न्यायालयाने महाराष्ट्र शासनाला व सर्व प्रतिवाद्यांना संचमान्यतेबाबत आहे ती परिस्थिती ठेवण्याचे अंतरिम आदेश पारित केले. पुढील सुनावणी जून मध्ये होईल. या आदेशामुळे नवीन संचमान्यतेनुसार याचिकाकर्त्यांना अतिरिक्त ठरवता येणार नाही. शासनाच्या १५ मार्च २०२४च्या अ न्यायकारक संचमान्यतेविरोधात राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या माध्यमातून जिल्ह्यातील शिक्षकांनी याचिका दाखल करून उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. यानिर्णयाविरोधात शशांक आटक यांच्यासह १९३ शिक्षक न्यायालयात गेले आहेत. १५ मार्च २०२४ रोजी नवीन

### पुढील सुनावणी जून मध्ये

शिक्षकांची संचमान्यता शासननिर्णय निर्गमित करून संचमान्यतेच्या निकषात बदल केला आहे. पटसंख्येवर आधारितयानिर्णयाचा मोठा फटका कोकणातील ५ जिल्ह्यांना बसला असून पदवीधर शिक्षकांची सुमारे ५० टक्के पदे अतिरिक्त ठरणार आहेत.

या निर्णयाविरोधात शिक्षक संघटनांनी जुलै २०२४ मध्ये शिक्षकांचे मोर्चे काढले. मार्च २०२५ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलने केली परंतु, शासनाने अन्यायकारक शासननिर्णय बदललेला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील १९३ पदवीधर शिक्षकांनी मुंबई उच्च न्यायालय खंडपीठासमोर याचिका दाखल केली आहे. हा निर्णय शिक्षक आस्थापनेवर प्रतिकुल परिणाम करणारा आहे. जिल्ह्यात या ४ आदेशाने ८००पदवीधर शिक्षक, १६० उपशिक्षक व ६ मुख्याध्यापक अतिरिक्त ठरण्याचा धोका आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवरही प्रतिकूल परिणाम होणार आहे. प्रत्येक वर्गाला आठवड्यातून ४८ तासिका अध्यापन करायचे असताना १ ते ४/५ च्या शाळेत चार ते पाच वर्गव दोन शिक्षक तर १ ते ८ च्या शाळेत ६ ते ७ वर्ग व दोन शिक्षक अशी स्थिती होणार आहे. मग, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे तीन–तेरा वाजणारच आहेत. पहिलीपासून प्रत्येक वर्गाला किमान ६ ते ९ विषय आहेत. एक शिक्षक व दोन ते तीन वर्ग अध्यापन करणे शक्य नाही. सातवीला ९ विषय आहेत. प्रत्येक इयत्तेची पुस्तके वेगवेगळी आहेत.

ऑनलाईन कामाची भरमसाठ यादीच मुख्याध्यापकांच्या सोबतीला आहे. यामुळेयाचिका केल्याची माहिती शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे व सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी दिली.

शासन निर्णय मागे न घेतल्यामुळे अखेर शिक्षकांना न्यायालयाचे दार ठोठवावे लागले असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले.–

# पादचाऱ्याचा गोफ लुटण्याचा प्रयत्न फसला, ऐनवेळी मोबाइल फळविला

## बियाणी चौक ते शिलांगण मार्गावरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती –** विना क्रमांकाच्या दुचाकीवर आलेल्या अज्ञात दोन लुटारूंनी इव्हिनिंग वॉक करणाऱ्या व्यापाऱ्याच्या गळ्यातील सोन्याचा गोप लुटण्याचा प्रयत्न केला. परंतु, व्यापाऱ्याने गोप पकडून ठेवल्याने लुटारूंनी त्यांच्या जवळील १० हजार रूपयांचा मोबाइल लुटला. राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या बियाणी कॉलेज ते शिलांगण मार्गावर ४ मे रोजी सायंकाळी ही घटना घडली. मानकलाल मदनलाल सोमानी (६८) रा. रविनगर गल्ली नगर ५ असे तक्रारकर्त्यांचे नाव आहे. मानकलाल सोमानी हे कपडा व्यापारी असून रवि नगरात हनुमान मंदिराजवळ राहतात. दुकानातून घरी आल्यानंतर ते दररोज सायंकाळी बियाणी कॉलेजमध्ये इव्हिनिंग वॉक करण्यासाठी गेले होते. परंतु, बियाणी कॉलेजमध्ये नीटचा पेपर असल्याने पोलिस – ांनी त्यांना कॉलेजच्या आत जाण्यास नकार दिला.त्यामुळे मानकलाल फोनवर बोलता– बोलता शिलांगण रोडवर गेले. ते महावितरणच्या कार्यालया समोर आले असता मागून दुचाकीवर आलेल्या अज्ञात लुटारूंनी त्यांच्या गळयातील सोन्याचा गोप लुटण्याचा प्रयत्न केला. लुटारूंनी मानकलाल यांच्या हातातील रेडमी कंपनीचा १० हजाराचा मोबाइल हिसकून दुचाकीने पसार झाले. मानकलाल यांनी तात्काळ राजापेठ पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली.

> **कंवरनगर चौकात महिलेचा मोबाईल लुटला**
>
> राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कवरनगर चौकात महिलेचा मोबाइल लुटल्याची घटना घडली. महिला मुलीसह कर्वर नगरातील महानुभाव आश्रम चौकात पाणी पुरी खात असताना दुचाकीवर आलेल्या अज्ञात लुटारूंनी त्यांच्या हातातील ४ हजाराचा मोबाइल लुटला.–

# वीज पडून शेतकऱ्याचा दुर्देवी मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७धामणगाव रेल्वे–** जुना धामणगाव जवळच्या शेतशिवारात एका ७२ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (ता.६) उघडकीस आलो.

जुना धामणगाव येथील विनायक शेषराव बोरकर (७२) हे सायकलने सोमवारला (ता.५) सायंकाळी शेतात गेले होते. सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पावसाला सुरूवात झाली. त्यामुळे त्यांनी अनिल वानखडे यांच्या शेतात सायकल उभी करून एका झाडाखाली आश्रय घेतला. दरम्यान जोरदार वीज कडाडलीव त्यांचा घटनास्थान मृत्यू झाला. घरी आले नाही म्हणून कुटुंबीयांनीशोधाशोध घेतली परंतु शोध लागला नाही. दरम्यान अनिल वानखडे यांच्या शेतात मंगळवारला (ता. ६) मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती दत्तापुर पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. मृतदेहाची उत्तरीय तपासणी येथील ग्रामीण रुग्णालयात करण्यात आली. मंगळवारला (ता.६) जुना धामणगाव येथील स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली बराच आप्त परिवार आहे.

# कंवर नगरातील एसबीआयचेएटीएम फोडणाऱ्या चोरट्याला अटक

## दोन मंदिरासह ५ घरफोडीचे गुन्हे उघड४७ हजार ९९० रूपयांचा मुद्देमाल जप्त

### फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती**

फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यातील डीबी स्कॉडने कवंर नगर चौकातील एसबीआय बँकेचे एटीएम मशीन फोडणाऱ्या कुख्यात चोरट्याला अटक केली. तसेच चोरट्याकडून एकूण ५ घरफोडीचे गुन्हे दाखल उघड झाले. पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून दुचाकीसह एकूण ४७ हजार ९९० रूपयांचा ऐवज जप्त करण्यात आला.

अक्षय संजय गवई (२९) रा. जय सियाराम नगर, महेंद्र कॉलोनी, अमरावती असे अटकेतील चोरट्याने नाव आहे. फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्याहद्दीत प्रांतनगरातीलसंकट मोचन हनुमान मंदिरात २ मे रोजी अज्ञात चोरट्याने चोरी केली होती.

चोरट्याने दानपेटी फोडून ४८ रूपये लंपास केले होते. अशातच कवंर नगर चौकातील एसबीआय बँकेचे एटीएम फोडण्याची घटना घडली. त्यामुळेफ्रेजरपुराचे ठाणेदार पीआय निलेशकरे यांनी ठाण्यातील दुयम ठाणेदार पीआय निलेश गावंडे, डीबीस्कॉडचे प्रमुख पीएसआय राहुल महाजन, कॉस्टेबल योगेश श्रीवास, हरीश बुंदेले, शशिकांत गवई, हरीश चौधरी, रोशन वराडे, जयेश परिवाले, उमेश चुलपार यांच्यासह मिळून युध्दपातळीवर गोपनीय व तांत्रिक पध्दतीने तपास सुरू केला. तसेच पोलिसांनी १० ठिकाणचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले.

दरम्यान रेकार्डवरील कुख्यात चोर अक्षय गवईने एटीएम फोडण्याचा प्रयत्न केल्याचे तांत्रिक तपासात उघड झाल्याने पोलिसांनी अक्षय गवईची शोधमोहिम राबवून त्याला अटक केली.अटक होताच अक्षय गवईने एटीएम फोडण्याचा प्रयत्न केल्यासह दोन मंदिरात व अन्य ठिकाणी घरफोडी केल्याचीकबूलीदिली. त्यानुसार पोलिसांनी अक्षयच्या ताब्यातून चोरीतील एमएच–२७–सीएफ–७०९४ क्रमांकाची व रोख रक्कम असा एकूण ४७ हजार ९९० रूपयांचा ऐवज जप्त केला.



# येवद्यातून कपाशीचे बियाणे जप्त : कृषी विभागाच्या भरारी पथकाची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ येवदा**

कृषी विभागाच्या भरारी पथकाने दर्यापूर तालुक्यातील वेवदा येथून एका व्यापाऱ्याकडून एकूण ३ हजार १५० ग्रॅम बियाणे जप्त करण्यात आले. या हंगामातील ही पहिलीच कारवाई आहे.

येवदा येथील देवेंद्र बद्रिनारायण राठी याने कपाशीचे प्रतिबंधित एचटीबीटी बियाणे विक्रीसाठी आणले असल्याची माहिती कृषी विभागाच्या भरारी पथकास मिळाली. त्याने हे बियाणे तेथीलच ढोमणापूर येथील एका शेतकऱ्याच्या घरात ठेवले होते. त्याच्या घराची झडती घेतली असता तेथून राज्यात प्रतिबंध असलेले बीटी कपाशीचे सात पाकिटे आढळून आलीत.प्रत्येक पाकिटाचे वजन ४५० ग्रॅम असून एकूण ३ हजार १५० ग्रॅम बियाणे जप्त करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या कपाशीच्या पाकिटावर चेन्नई येथील एका कंपनीचे नाव छापलेले आहे. या पाकिटावर बियाणे उत्पादक व विपणनकर्ता यांच्या नावाचा उल्लेख नसून जेनेटिक इंजिनियरिंग अप्रूव्हल कमिटीच्या मान्यतेचा उल्लेख आढळून आला नाही. त्यामुळे हे बियाणे अधिकृत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. व्यापारी राठी यांनी विनापावती या बियाण्याची विक्री ढोमणापूर येथील शेतकरी केशव गावंडे यांना केल्याचेही आढळून आले. विक्रेते राठी यांनी शेतकऱ्याची फसवणूक करण्याच्या हेतूने आणल्याच्या आरोपाखाली येवदा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

**विक्रेत्याकडे परवाना नाही**

कृषी निविष्ठा विक्रेते देवेंद्र राठी यांच्याकडे बियाणे विक्रीचा परवाना नसल्याचे कृषी विभागाने सांगितले. त्याचा परवाना गतवर्षी कपाशीचे विशिष्ट वाणाचे बियाणे जादा दराने विक्रीच्या आरोपाखाली रद्द करण्यात आला आहे. विद्यमान स्थितीत त्याच्या पुतण्याच्या नावे परवाना असल्याचे समजते.

# राज्यात तर तीन माकडांचे सरकार..! माजी राज्यमंत्री बच्चू कडूंची खरमरीत टीका

## एकाच्या तोंडावर, एकाच्या डोळ्यावर बोट एकाच्या कानावर हात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीच्या वेळी प्रत्येक सभेत शेतकर्याचा सातबारा कोरा झाल्याशिवाय राहणार नाही, असे आश्वासन दिले होते. चार महिने झाले, उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतात, पैसे नाहीत. देवेंद्र फडणवीस बोलायला तयार नाहीत. दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना कानच राहिलेले नाहीत. त्या तीन माकडांसारखी अवस्था झाली आहे.एकाच्या तोंडावर बोट आहे, एकाच्या डोळ्यावर बोट आहे. एकाच्या कानावर हात आहेत. आता कुणाला सांगावे. कोणता भोंगा वाजवावा. ज्यामुळे या तीन माकडांचे तोंड उघडेल, अशी खरमरीत टीकाप्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी मंगळवारी येथे केली.संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात आयोजित संताजी धनाजी पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. बच्चू कडू म्हणाले, तामिळनाडू सरकारचा अर्थसंकल्प ३ लाख कोटींचा आहे.बच्चू कडू म्हणाले, एकीकडे गडगंज संपत्तीचे प्रदर्शन करणारे राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आजूबाजूला दिसतात. रेस्टॉरंट, बिअर बारमध्ये हे कार्यकर्ते बसतात. विचित्र स्थिती निर्माण झाली आहे. पण, अशा विपरित परिस्थितीतही आम्ही आमच्याशेतकरी बापाची लढाई लढण्यासाठी मैदानात उतरलो आहोत. ही साधी आणि सोपी गोष्ट नाही आहे. छातीवर दगड ठेवावा लागेल.

किती इंचाची छाती आहे, हे माहित नाही. पण त्या ५६ इंचाच्या छातीपेक्षा दहा पट मजबूत ही कार्यकर्त्यांची छाती आहे, हे आम्हाला माहीत आहे. बच्चू कडू म्हणाले, शेतकरयांवर अन्याय होत असताना, ते आत्महत्या करीत असताना कुणाला राग येत नाही. राग येण्याची प्रक्रियाच थांबली आहे की काय, असा प्रश्न आम्हाला पडतो. आता रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. हक्काची लढाई आपल्याला लढावी लागणार आहे. आधी काँग्रेसची राजवट होती, आता भाजपची आहे. २०२२ पर्यंत नरेंद्र मोदी सर्वांना घर देणार होते, त्याचे काय झाले, असा सवाल बच्चू कडू यांनी केला.

# मांगीया गावानजीक खाजगी बसचा अपघात; २ गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ धारणी**

धारणी ते परतवाडा मार्गावरील हरीसाल पासून दहा कि. मी. अंतरावर असलेल्या मांगीया गावाजवळ खाजगी बसचा अपघात झाला असून अनेकजण जखमी झाले आहेत, तर दोन गंभीर जखमी झाले आहे.

बहाणपूर- नागपूर जाणारी बस क्रमांक एमपी. ४८ झेडबी ५९८३ या



भरधाव खाजगी बसवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने मांगीयाच्या पुढे मोठ्या वळणावर खाजगी बस पलटी झाली आहे. त्यात अनेक जण जखमी झाले असून दोन जण गंभीर जखमी झाले आहे.जखमीवर प्राथमिक आरोग्य केंद्र हरीसाल येथे उपचार सुरू आहे. गंभीर जखमींना उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.गेल्या काही दिवसांपूर्वी सेमाडोह नजीक खाजगी बसचा अपघात झाला होता. या अपघातात सात लोकांचा बळीगेला होता. अशा खाजगी बस अपघाताच्या अनेक घटना घडत आहे. या खाजगी बसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी प्रवास करीत असल्याची माहिती आहे. या बसमध्ये प्रवाशांना बसण्यास जागा मिळत नसून उभे राहून त्यांना जीवघेणा प्रवास करावा लागतो.

# चिखलदरा तालुक्यातील पाणीटंचाई निवारण्याचे दिले आदेश

## खासदारांनी घेतला मेळघाटातील पाणीटंचाईचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७चिखलदरा**



मेळघाटात सद्यस्थितीमध्येपाणीटंचाई सर्वच गावांमध्ये मोठ्या प्रमाणात आहे. मेळघाटातील आदिवासी बांधव पाण्यासाठी दाही दिशा भटकंती करत असून तक्रार निवारणाच्या उद्देशाने मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या पाणीसमस्या सोडविण्याच्या उद्देशाने खा. बळवंत वानखडे यांनी चिखलदरातहसील कार्यालयात पाणीटंचाईवर आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला वनविभाग, पाणीपुरवठा विभाग, तहसील कार्यालय, पंचायतसमिती व सर्वच ग्रा.पं. सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, तलाठी उपस्थित होते

या बैठकीत खा. बळवत वानखडे यांनी तालुक्याचा आढावा घेतला. गावात पाणीटंचाई असून पाणीटंचाई तत्काळ निवारण करावे, असे आदेश खा वानखडे यांनी अधिकाऱ्याऱ्यांना दिले. चिखलदरा तालुक्यातील अनेक गावामध्ये पाणीपुरवठ्याच्या योजना तयार करण्यात आल्या आहेत; परंतु या योजनांचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या तक्रारी नागरिकांकडून व पदाधिकाऱ्यांकडून मांडण्यात आल्यात. अनेक कामांमध्ये अनियमित आढळली आहे. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे काम अतिशय ढिसाळ पद्धतीने सुरू आहे, असेही सूर यावेळी पदाधिकाऱ्यांनी लावले, तसेच पाणीपुरवठ्याच्या कामामध्ये अनेक ठिकाणी वनविभागाचा अडथळासुद्धा आहे. अशा प्रकारचे अडथळे आता सहन केले जाणार नाहीत वनविभागाचे अधिकारी जाणून अडथळे आणतात. ज्याप्रकारे जनावरे महत्त्वाचे आहेत, त्या प्रकारे आमचा माणूसही महत्त्वाचा आहे. आदिवासी बांधवांना पाणी मिळत नसेल, तर अशा प्रकारचा अन्याय कदापी सहन केला जाणार नाही. या काही परवानग्याच्या फाईल असतील त्याचा पाठपुरावा तत्काळ अधिकाऱ्यांनी करायला पाहिजे आणि ज्या ठिकाणी पाणीटंचाई असेल त्या ठिकाणच्या पाणीटंचाईची समस्या सोडविण्यात यावी, अशा प्रकारचे आदेश खा. वानखडे यांनी अधिकाऱ्यांना दिलेत.या बैठकीला तहसीलदार जीवन मोरणकर, गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकळे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती दयाराम काळे, महेंद्र गैहेलवाल, शेख जहीर शहराध्यक्ष चिखलदरा काँग्रेस कमिटी, राहुल येवले प्रदेश उपाध्यक्ष युवक काँग्रेस, संदीप मुडे, खोज संस्थेचे बंड्या साने आदी पदाधिकारी उपस्थित होते, तसेच तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, तलाठी, वनविभाग, पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# १२ ला शहरातून निघणार विश्वशांती रॅली पाच दिवस चालणार विविध कार्यक्रम बुद्ध जयंती उत्सव समितीचे आयोजन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

बुद्ध जयंती उत्सव समिती व्दारा भव्य विश्वशांती व बुद्ध जयंती महोत्सवाचे आयोजन ८ मे पासून १२ मे पर्यंत करण्यात आल्याची माहिती मराठी पत्रकार भवन मध्ये आयोजित पत्रकार परिषदेत आयोजकांनी दिली.गुरुवार आठ मे पासून या महोत्सवाला सुरुवात होणार आहे. गौतम बुद्धांच्या जीवनावर आधारित विविध स्पर्धा बुद्ध भीम गीतांचे मैफिल रंगणार आहे महाराष्ट्रातील २४ नामवंत गायक गायकांना आमंत्रित करण्यात आले आहे. थोर महापुरुषांच्या जीवनावर आधारित रांगोळी स्पर्धा चित्रकला स्पर्धा पथनाट्य एकपात्री प्रयोग देखावे दृश्य रथ लेझीम पथके लाठ्या-काठ्यांचे प्रात्यक्षिक आधी आदींचा समावेश या महोत्सवात राहणार आहे.

तसेच विश्वशांती कला व गायन पुरस्कार व विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. १२ मे रोजी आयोजित विश्वशांती रॅलीमध्ये सर्व धर्माचे धर्मगुरू सहभागी होणार आहेत.विश्वशांती रॅलीचे उद्घाटन संध्याकाळी ७:३० पोलीस आयुक्त नवीन चंद्र रेड्डी यांच्या हस्ते होणार आहे, तर रॅलीच्या अध्यक्षस्थानी विभागीय आयुक्त श्रीमती श्वेता सिंगल राहणार आहेत प्रमुख अतिथी जिल्हाधिकारी सौरभ कटियार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनपा आयुक्त सचिन कलंत्री जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद उपजिल्हाधिकारी अनिल भटकर शिक्षणाधिकारी मनपा प्रकाश मेश्राम मिलिंद देवरे, उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनवणे इंजिनीयर नितीन भटकर आदी उपस्थित राहणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून रॅलीला सुरुवात होणार आहे. या रॅलीचा समारोप हिम टेकडी येथे करण्यात येईल अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.पत्रकार परिषदेला सुनील रामटेके, जगदीश गोवर्धन, प्रा.डॉ. रविंद्र मुंदे, महेंद्र भालेकर, सुरेश तायडे आदी उपस्थित होते.

# तहानलेल्यांची तहान भागवणारी पनपालिया ग्रुपची सार्वजनिक पानेरी : पनपालिया कुटूंबाचा अनोखा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७दर्यापूर**



दर्यापूर एसटी स्टँड चौकात पनपालिया परिवारातर्फे दरवर्षी सार्वत्रिक पानेरी सुरू करून रोज शेकडो लोकांना तहानलेल्यांना पाणी पाजण्याचं काम ही पानेरी करते एवढेच नाही तर या पानेरी द्वारे शासनाच्या वेगवेगळ्या योजनांचा प्रचार सुद्धा ही पानेरी करताना दिसत आहे मग त्यामध्ये झाडे लावा झाडे जगवा, बेटी वाचवा बेटी बचाव बेटी पढाव, पाणी अनमोल आहे पाण्याच मोल जाना, पाणी वाचवा अशा विविध प्रकारच्या म्हणीद्वारे सार्वत्रिक पानेरी सजली असून रोज ताणलेले पाणी पिण्याकरता येतात व तृष्णा तृप्तीचा लाभ घेतात व त्याचबरोबर या लावलेल्या प्रचारार्थ जाहिरातींचं वाचन करतात सार्वत्रिक जागेवर दरवर्षी पाण पोई लावण्याचे काम श्री मदनगोपालजी पनपालिया चॅरिटेबल ट्रस्ट दर्यापूरच्या वतीने करण्यात येते एवढेच नाही तर मूर्तिजापूर रोडवर असलेले इच्छापूर्ती दुर्गा माता मंदिर या ठिकाणी सुद्धा पिण्याच्या पाण्याची सार्वत्रिक सोय त्या ट्रस्टने केलेली आहे त्या ट्रस्टचे बालकिसनजी पनपालिया यांच्या मार्गदर्शनाखाली राजेश पनपालिया, सुभाष पनपालिया, विजय पनपालिया, संजय पनपालिया, प्रवीण पनपालिया व त्यांचे सर्व सहकारी कर्मचारी या उपक्रमावर लक्ष ठेवून असतात सातत्याने २४ तास पिण्याचे पाणी तेही थंडगार पाण्याची व्यवस्था सुद्धा करतात हे प्रामुख्याने महत्त्वाचे आहे.

# दर्यापूर येथे बालविकास संस्कार शिबिराचा शुभारंभ : एक मे ते २१ मे दरम्यान चालणार शिबिर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७दर्यापूर ३२**



संत गाडगे बाबा वस्तीगृह दर्यापूर येथील भव्य प्रांगणात दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा श्री संत ब्रम्हलीम वासुदेव जी महाराज कृपा आशीर्वादित प्रेरणेने स्थापित कृपासागर श्री संत वासुदेव जी महाराज मानवता सेवा ट्रस्ट द्वारा संचालित श्री संत भास्कर महाराज आदर्श सर्वांगीण बालविकास सुसंस्कार शिबिराचे आयोजन केले असून १ मे ते २१ मे २०२५ दरम्यान हे शिबिर सुरू राहणार आहे. या शिबिराचा शुभारंभ ह भ प प्रकाशजी सित्रे यांच्या अध्यक्षतेखाली तथा संस्थाध्यक्ष भागवताचार्य हभप सागर महाराज परिहार आणि ह भ प श्री शिबिर संचालक ज्ञानेश्वर महाराज तिडके, प्रमुख पाहुणे श्री राजेंद्र जी धोटे गुरुजी श्री गजानन कोकाटे गुरुजी श्री रमेश रावजी अवघाते श्री प्राचार्य गोपाळराव गौरखेडे सर यांच्या उपस्थितीत झाला या शिबिरामध्ये संस्कृत वायय श्रीमद् भागवत गीता तसेच भागवत महापुराण निवडक श्लोक गोपी गीत संस्कृत सुभाषिते तथा अष्टके बौद्धिक मध्ये आध्यात्मिक ज्ञान विषयक प्रश्न उत्तरे ओव्या अभंग हरिपाठ सुलभ घरगुती औषधोपचार सांस्कृतिक व शारीरिक मध्ये गायन वादन पावल्या व भारुड योगासन मलखांब रोप मलखांब, लेझीम, लाठीकाठी ,तायकांडो, समाज प्रबोधनांमध्ये हुंडाबळी, व्यसनमुक्ती, व्यसनाचे दुष्परिणाम, संतांची चरित्रे ,थोरांची चरित्रे आधी विषयांचे प्रशिक्षण तज्ञ प्रशिक्षकांकडून विनामूल्य शिकविल्या जाणार आहे तरी वरील शिबिराला सर्वांनी सदिच्छा भेट देऊन सहकार्य करावे असे आवाहन शिबिर मुख्याध्यापक हपश्री मंगेश महाराज गावंडे शिबिर प्रमुख ह भ प श्री वैभव महाराज तराळ उपमुख्याध्यापक ऋषिकेश महाराज सरोदे प्रवीण सित्रे, गोपालजी वडतकर आदींकडून करण्यात येत आहे.

# अनावश्यक विधुत उपकरणांचा वापर टाळावा महावितरण दर्यापूरचे ग्राहकांना आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७दर्यापूर**

यंदाचा उन्हाळा हा अधिक तापायला लागला असल्यानें घरगुती वापरातील वातावरण थंड करणारे विद्युत उपकरणे यांचा वापर अधिक प्रमाणात वाढला असून त्यामुळे विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत आहे शहरात व ग्रामीण भागात ज्या दिवशी पाणीपुरवठा होत असतो त्या दिवशी अतिरिक्त विजेची मागणी वाढली असल्याने विद्युत ट्रीप होने सुद्धा वाढले आहे पाण्याचा दाब कमी असल्यामुळे घरगुती व व्यावसायिक ग्राहक हे पाणी ओढण्याची मशीन लावत असल्याने एकाच वेळी विद्युतची मागणी वाढत असून ग्राहकांचे पाणी भरणे अपूर्णच राहते अश्या उन्हाच्या दिवसात पिण्याच्या पाण्याचा व वापराच्या पाण्याचा प्रश्न उपस्थित होत आहे त्याकरिता महावितरण दर्यापूरणे ग्राहकांना वीज बचतीचे आवाहन केले आहे नळ येताना घरगुती वापरातील अनावश्यक विद्युत उपकरणे बंद करावे जसे की कुलर एसी पंखे लाईट फ्रीज यांचा सुद्धा वापर काही वेळ थांबवावा जेणेकरून विद्युत पुरवठ्याचा सर्वत्र समतोल राखला जाईल व ग्राहकांचे पाणी भरणे पूर्ण होईल.

# प्रदूषण करणाऱ्या वाहनांना पेट्रोलपंपावर इंधन दिले जाणार नाही; प्रताप सरनाईकांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७पुणे**

वाढत्या वायुप्रदूषणाला रोखण्यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचा विचार सुरू केला आहे. तांत्रिकदृष्ट्या सदोष व प्रदूषण करणाऱ्या वाहनांना लवकरच पेट्रोलपंपावर इंधन दिले जाणार नाही, असे स्पष्ट संकेत परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. मंत्रालयात पार पडलेल्या परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यासाठी लवकरच 'नो पीयूसी, नो इंधन' धोरण लागू करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीला परिवहन विभागाचे सहसचिव किरण होळकर, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार तसेच विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत वायुप्रदूषणाच्या वाढत्या समस्येवर गंभीर चर्चा झाली. मंत्री सरनाईक यांनी यावेळी स्पष्ट केले की, राज्यात दररोज हजारो नव्या वाहनांची नोंद होत आहे. या वाहनांमुळे आणि जुन्या, तांत्रिकदृष्ट्या सदोष वाहनांमुळे वायुप्रदूषणात कमालीची वाढ झाली आहे. परिणामी, हवा गुणवत्ता निर्देशांक सातत्याने



खालावत आहे. राज्य शासनाने प्रत्येक वाहनासाठी प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (झ.ण.उ.) बंधनकारक केले आहे. मात्र, अनेक वाहनधारक बनावट प्रमाणपत्र घेऊन किंवा तपासणी न करता वाहने चालवत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. अशा प्रकारांवर आळा घालण्यासाठी पेट्रोलपंपांवर 'नो पीयूसी, नो इंधन' हे धोरण लवकरच कठोरपणे लागू करण्यात येणार आहे.

नव्या धोरणानुसार, वाहनांचे पीयूसी प्रमाणपत्र क्यूआर कोड आधारित असणार असून त्याद्वारे प्रमाणपत्राची वैधता डिजिटल पद्धतीने तत्काळ तपासली जाईल. पेट्रोलपंपांवर वाहनाची प्रदूषण तपासणी प्रणाली कार्यरत राहील व फक्त वैध प्रमाणपत्र असलेल्या वाहनांनाच इंधन दिले जाईल. यानुसार येत्या काळात जुन्या आणि तांत्रिकदृष्ट्या फीट नसलेल्या वाहनांबाबत कठोर निर्णय घेतले जाणार असल्याचे संकेत परिवहन मंत्र्यांनी दिले आहेत.

# महापालिका निवडणुकांमध्ये विदर्भात भाजप-काँग्रेसची असणार परीक्षा, हेविवेट नेत्यांना लागणार कस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

महापालिका निवडणुका न झाल्याने मार्च २०२२ पासून विदर्भातीलनागपूर, अमरावती, चंद्रपूर व अकोला महापालिकेचे प्रशासन प्रशासकांच्या हाती आहे. पुढील चार महिन्यांत निवडणुकांचा धुरळा उडणार असल्याने सर्वच पक्षांनी कंबर कसण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः विदर्भातील या चारही महानगरपालिकांमध्ये भाजप व कांग्रेसमध्ये प्रमुख टक्कर आहे. विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कांग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन



सपकाळ, विजय वडेट्टीवार यांच्यासारख्या नेत्यांचा कस लागणार आहे. विशेष म्हणजे चंद्रपुरात भाजपकडून माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यावर प्रचाराची धुरा देण्यात येते का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

प्रशासक राज येण्यापूर्वी अकोल्यात ४८ नगरसेवक असलेल्या भारतीय जनता पक्षाची महापालिकेत सत्ता होती. तर नागपुरात भाजपकडे १०८ नगरसेवकांसह सत्तेची चावी होती. तर अमरावती व चंद्रपूरमध्येदेखील भाजपचीच सत्ता होती.

**अमरावतीत कुणाचा खेला होणार?**

अमरावती महानगरपालिकेत २२ प्रभाग असून ८७नगरसेवक तथा पाच स्वीस्कृत सदस्यांसह एकूण ९२ नगरसेवक आहेत. २०१७ मधील निवडणुकीत भाजपचे ४५, कॉंग्रेस १५, एमआयएम १०, शिवसेना (ठाकरे गट) ७, बसपा ५, युवा स्वाभिमान पार्टी ३, रिपाइं (आठवले गट) १ आणि एक नगरसेवक अपक्ष निवडून आले होते. २०१७ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने खातेही उघडले नव्हते. मात्र आता अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके, विधान परिषद सदस्य संजय खोडके हे पती-पत्नी राजकीय शक्तीनिशी येत्या महानगरपालिका निवडणूक मैदानात उतरतील. तसेच शिवसेना दोन गटात विभागल्या गेल्याने ठाकरे आणि शिंदे सेना आमने-सामने असतील. विधानसभेत अमरावती जिल्ह्यात काँग्रेसच्या यशोमती ठाकूर, प्रहारचे बच्चू कडू यांचादेखील पराभव झाल्याने भाजपमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. तर काँग्रेससमोर मतदारांना परत खेचून आणण्याचे आव्हान आहे.

# शिरजगाव मोझरी येथे ज्वारी पिकाची रान डुकरांनी केली नासाडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७शिरजगाव मो.**

तिवसा तालुक्यात शिरजगाव मोझरी येथील शेतकऱ्यांच्या पिकावंर रानडुकरांनी उच्छाद मांडला असून, सर्वच पिकांची नासाडी करण्यात येत असल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. नासाडी झालेल्या पिकांचा पंचनामा करून तत्काळ मदत मिळण्याची मागणी शेतकरी करीत आहेत.तालुक्यातील वनक्षेत्रातील वन्य प्राण्यांमध्ये सर्वाधिक रानडुकरांची संख्या असल्याचे वन विभागाच्या पाहणीतून समोर आले आहे. रानडुकरांची वाढती संख्या ही शेतकर्यांसाठी डोकेदुखी ठरली आहे. सद्यस्थितीत असलेल्या ज्वारी, मका व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान रानडुकरांकडून करण्यात येत आहे. रब्बी ज्वारीचे क्षेत्र ऐन बहरात असतानाच रानडुकरांकडून नुकसान होत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे. शिरजगाव मो. येथील शेतकरी साहेबरावजी फाटिंग यांनी पावसाळी पिकात नापिकीची भर काढण्यासाठी म्हणून चार एकर लागवडीने शेत केले. त्यात ज्वारीची पेरणी केली. ज्वारी हुरडयात आली असताना रानडुकरांनी अर्धा ते पाऊण एकर ज्वारीचे मोठे नुकसान केले. ज्वारी संपूर्णतः पाडण्यात आली. नुकसान झालेल्या पिकाचे पंचनामे करून मदत मिळण्याची गरज आहे.रब्बी हंगामात शिरजगावं मो. सह अनेक गावात ज्वारीची पेरणी करण्यात आली होती. काही हेक्टर क्षेत्रावर मका व इतर चारा पिकांची पेरणी करण्यात आली. खराब हवामानाचा परिणाम सर्वच पिकांवर दिसून आला. पिकांना विविध रोगांनी ग्रासले असताना महागड्या औषधांची फवारणी करून शेतकर्यांनी पिके जगविण्याचा प्रयत्न केला. अशातच रानडुकरांकडून पिकांची नासाडी होत असल्याने शेतकर्यांसमोर नवीन संकट उभे ठाकले आहे.शिरजगावं पट्ट्यातील ज्वारी पिकांचे मोठ्या प्रमाणात रानडुकरांकडून नुकसान सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.पट्ट्यातील ज्वारीचे व मका पिकाचे मोठ्या प्रमाणात रानडुकरांनी नुकसान केले.या भागात रानडुकरांचा उपद्रव वाढल्याने रानडुकरांचा बंदोबस्त करण्यात यावा. रानडुकरांकडून झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून संबंधित शेतकर्याला तत्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी साहेबराव फाटिंग यांनी केली आहे.

# पोलिस स्टेशनमधील ए.पी.जे. अब्दुल कलाम अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांचे सुयश

## स्पर्धा परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अचलपूर**

महाराष्ट्र शासनामार्फत घेण्यात आलेल्या विद्युत सहाय्यक पदासाठीच्या स्पर्धा परीक्षेमध्ये अचलपूर पोलिस स्टेशन अंतर्गत कार्यरत ए.पी.जे. अब्दुल कलाम अभ्यासिकेतील सहा विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या विद्यार्थ्यांनी अपार मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर ही प्रतिष्ठित पदावर निवड मिळवली आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये शुभम काटकर ,दानिश खान



पुष्पक डोईफोडे, , साक्षी बेंद्रे, तेजस रेवाडे यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांनी विद्युत सहाय्यक या पदावर निवड होऊन आपल्या कुटुंबीयांसह, अभ्यासिका आणि अचलपूर पोलिस प्रशासनाचेही नाव उज्वल केले आहे.ए.पी.जे. अब्दुल कलाम अभ्यासिका ही अचलपूर पोलिस स्टेशनच्या वतीने राबवण्यात आलेली एक सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम आहे. विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी अनुकूल वातावरण, सुविधा आणि मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचा उद्देश या अभ्यासिकेमागे आहे. पोलिस स्टेशनच्या परिसरातच ही अभ्यासिका चालवली जाते, ही एक अनोखी आणि प्रेरणादायी संकल्पना ठरली आहे.या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशानिमित्ताने अचलपूर पोलिस स्टेशनमध्ये एक सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन, पेढे वाटून आणि टाळ्यांच्या गजरात सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला पोलिस स्टेशनचे अधिकारी, कर्मचारी आणि अनेक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या विद्यार्थ्यांचे यश हे केवळ त्यांच्या अभ्यासाचे फलित नसून, अचलपूर पोलिस प्रशासनाच्या सामाजिक भान आणि सकारात्मक विचारसरणीचेही प्रतिक आहे. परिसरातून तसेच सोशल मीडियावरूनही या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

सपने तेच बघा जे पूर्ण होऊ शकतात आणि त्यासाठी झटायला घाबरू नका, हे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे विचार या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कृतीतून साकार केले आहेत.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन अचलपुरात अभिनंदन करण्यात येत आहे.

# जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात औषध खरेदीत प्रचंड गडबड

## पोचपावत्या गायब, औषधसाठा नोंदवहीची पडताळणी नाही




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ७अमरावती**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात औषध खरेदीत प्रचंड गडबड होत असून, औषधी वाहतूक परवाना पोहोच पावत्या गायब झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. एवढेच नव्हेतर, औषधसाठा नोंदवहीची जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून कधीही पडताळणी झाली नाही. त्यामुळे 'भांडार'मध्ये प्रतिनियुक्तीवर कार्यरत औषध निर्माण अधिकारी 'वार' 'करी' यांचे चांगलेच फावले असून, त्यांच्याच आशीर्वादाने गत १० वर्षांपासून 'ग्लेशिअर' आणि 'सुवर्णा' या दोन एजन्सी 'आरोग्य'चे शोषण करीत आहेत.

जि. प.च्या आरोग्य विभागात औषध, साहित्य खरेदीची निविदा काढण्यापूर्वी अगोदर एजन्सी निश्चित केली जाते. गत १० वर्षांपासून 'ग्लेशिअर' आणि 'सुवर्णा' या दोनच एजन्सी औषधांचा पुरवठा करीत असल्याचे स्पष्ट होते. डीएचओंनी 'ग्लेशिअर'ला पुरवठा आदेश देण्यापूर्वी या एजन्सीचा इतिहास तपासला नाही.

औषधी गुणवत्ता रिपोर्ट घेण्याचे सौजन्यही दाखविले नाही. 'वार' 'करी' म्हणेल त्याप्रमाणे बहुतांश डीएचओंनी औषध खरेदीची ई-निविदा प्रक्रिया पार पडली आहे. त्यामुळेच गत काही दिवसांपूर्वी डीपीसीतून मिळालेल्या निधीतून १२ कोटींची औषध, साहित्य खरेदी झाली असून, एकट्या 'ग्लेशिअर'ला साडे पाच कोटींच्या वर पुरवठ्याचे आदेश देण्यात आले आहेत.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी यांचा आदेश क्रमांक ३७२३ नुसार 'ग्लेशिअर एजन्सीला १० मे २०२१ रोजी मोटेलुकॉस आणि मल्टिव्हिटॅमीन या दोन प्रकारच्या टॅबलेट पुरवठा करण्याचे कंत्राट दिले होते. या दोन्ही टॅबलेटची खरेदी सभागृहात गाजली होती. यात कोणाची भागीदारी अथवा अप्रत्यक्ष सहभागाबाबत सभागृहात गदारोळ झाला होता. असे असताना या एजन्सीची त्रयस्त संस्थेकडून तपासणी करण्याचे आरोग्य विभागाने धाडस केले नाही, हे विशेष. म्हणूनच 'ग्लेशिअर' दहा वर्षांपासून 'आरोग्य'चे शोषण करीत आहे.

**उपयोगिता प्रमाणपत्र नाही**

अमरावती जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात खरेदी साहित्य स्टॉक बुकचा वापर केला जातो. अनुपालन पत्र सोबत नसले तरी खरेदीसाठी मान्यता मिळते. खरेदी केलेली औषधी या प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र स्तरावर वितरित केलेली आहे. त्यांचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना ते कधीच घेतले जात नाही. एकंदरीत सावळा गोंधळ आहे.

**खरेदी औषधींचा तपासणी अहवाल सापडेना**


महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समितीत लेखा संहिता १९६८ चे विनियम ४३ (३) नुसार खरेदी केलेल्या औषधाचे त्रयस्थ संस्थेकडून गुणात्मक तपासणी केल्याबाबतचा गुणवत्ता तपासणी अहवाल आवश्यक असतो. परंतु, जिल्हा परिषदद्वारा खरेदी औषधींचा तपासणी अहवाल सापडत नाही.

> आरोग्य विभागाच्या भांडारमध्ये प्रतिनियुक्तीवर असलेले औषध निर्माण अधिकारी अमोल वारकरी यांना कार्यमुक्त करून त्यांना बदली ठिकाणी कार्यमुक्त करण्याविषयी सीईओ संजीता महापात्र यांच्याशी मंगळवारी चर्चा झाली आहे. त्यामुळे वारकरी हे एक, दोन दिवसांत मूळ जागी रुजू होतील, असे आदेश निर्गमित केले जाणार आहेत.
>
> **– डॉ. सुरेश आसोले,**
> **जिल्हा आरोग्य अधिकारी**

# अमरावती बाजार समिती संचालक मंडळास स्पष्टीकरणासाठी २० मेपर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

आर्थिक अनियमितता केल्याच्याकारणास्तव अमरावती बाजार समितीच्या १७संचालकांना बरखास्तीची नोटीस बाजाविली होती. परंतु ही नोटिस नियमानुसार नसल्याचा दावा अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने केला आहे. या नोटीसवर लेखी स्वरूपात मागविण्यात आलेले स्पष्टीकरण सादर करण्यासाठी जिल्हा



उपनिबंधकांनी त्यांना २० मेपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

बाजार समितीच्या यार्डमध्ये करण्यात आलेल्या विद्युत कामांसह इतर कामांमध्ये आर्थिक अनियमितता पाळण्यात आल्याचा आरोप करीत जिल्हा उपनिबंधकांकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या. या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी समिती गठित करण्यात येऊन अहवाल सादर करण्यात आला. अहवालात करण्यात आलेले दोषारोपण बघता जिल्हा उपनिबंधकांनी बाजार समितीच्या संचालक मंडळास वरखास्तीची नोटीस बजावली व लेखी उत्तर सादर करण्यासाठी ६ मे ही मुदत दिली होती. सभापती हरीश मोरे यांच्या नेतृत्वात सतराही संचालकांनी मंगळवारी जिल्हा उपनिबंधकांच्या कार्यालयात जाऊन मौखिक म्हणणे मांडले. जिल्हा उपनिबंधकांनी दिलेली नोटीस नियमानुसार नसल्याचे म्हटले आहे. यासंदर्भात लेखी उत्तर सादर करण्यासाठी मुदत देण्याची मागणी करण्यात आली. जिल्हा उपनिबंधकांनी संचालक मंडळाच्या विनंतीवरून स्पष्टीकरण सादर करण्यासाठी २० मे पर्यंत मुदतवाढ दिली आहे. यानिमित्ताने बाजार समितीचे राजकारण चांगलेच तापले आहे.

# श्रीगुरुदेव सर्वांगीण बाल सुसंस्कार निवासी शिबिराला सुरूवात : शिबिरात जिल्ह्यातील २०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ धामणगाव रेल्वे**

अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी यांच्या तत्वप्रणाली नुसार व श्रीगुरुदेव राष्ट्रधर्म प्रचार समिती सलग्नित तालुका श्रीगुरुदेव सेवा समिती तर्फे स्व. शकुंतलादेवी राधेश्यामजी लोया यांच्या स्मृती प्रित्यर्थ श्री गुरुदेव सर्वांगीण बाल सुसंस्कार निवासी ' श्यामली' शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले. आजचे बालक उद्याचे तरुण कार्यकर्ते होतील. गावाचा देशाचा पांगफेडतील उत्तम उत्तम गुणांनी या ग्रामगीतेतील ओवी प्रमाणे संस्कार ही काळाची गरज म्हणून श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिराचे उद्घाटन



कार्यक्रमाला कार्यक्रम अध्यक्ष म्हणून जनार्दनपंत बोथे तर उद्घाटक प.शंकरप्रसादजी अग्निहोत्री उपस्थित होते.प्रमुख अतिथी म्हणून श्रीमंत राजे मुधोजी महाराज भोसले, सचिन राजारामबापू घोंगटे, आमदार प्रताप अडसड, गोपाल कडू,डॉ.संजय आदमने,विठ्ठल काठोळे, रमेश ठाकरे,श्रीगुरुदेव सर्वांगीण बाल सुसंस्कार निवासी शिबीराचे मुख्य संयोजक गोपाल भूत,समाजसेविका राधा भूत,डॉ.किरण खडसे मंचावर उपस्थित होते.

शिबीराच्या उद्घाटना पूर्वी वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगे महाराज, स्वर्गीय शकुंतलादेवी लोया यांच्या प्रतिमेचे पूजन करून संकल्प गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. धामनगांव शहरातुन प्रथमच आय. ए .एस.परीक्षा उत्तीर्ण केल्या बद्दल रजत पत्रे व श्रीराम पत्रे चा शॉल व श्रीफल,स्मृति चिन्ह देऊन समितिच्या वतीने सत्कार कारण्यात आला.या सुसंस्कार शिबिराच्या माध्यमातून बौद्धिक तासीके अंतर्गत राष्ट्रीय एकात्मता, थोरांचे चरित्र, आदर्श दिनचर्या, सामुदायिक प्रार्थना ,सामुदायिक ध्यान, प्राणायाम ,सूर्यनमस्कार लाठीकाठी भजन, संगीत मलखांब , दांडपट्टा अशा विविध विषय शिकविले जाणार आहे या शिबिरात जिल्ह्यामधून २०० विद्यार्थी सहभागी झाले आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी आपल्या भाषणातून संस्कार ही काळाची गरज आहे आदर्श माता पिता असेल तर कुटुंब आदर्श होते हा देश ऋषीमुनींचा आहे साधुसंतांचा आहे म्हणून त्यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकून संस्कार अंगीकारणे महत्त्वाचे आहे असे मत व्यक्त केले तर उद्घाटीय भाषणात शंकरप्रसाद अग्निहोत्री यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून संस्कृतता चे श्लोकसांगत अर्थ समजाऊन सागीतले व सर्वांच्या अगोदर आई वडीलांची सेवा केली पाहिजे असे प्रास्ताविक दीपक इंगळे यांनी केले.